# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१८

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### कळवंत वाडी (ता.शिरूर, जि.पुणे) येथील ग्रामपंचायतील गावठाण हद्द व शीव सीमा रेषा हद्द निश्चित होऊन तलाठी सजा उपलब्ध होणेबाबत

**(१) ६३०१ (०४-०४-२०१५). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयातील मोठ्या ग्रामपंचायतीमधून लोकसंख्येत वाढ झाल्यामुळे अनेक ग्रामपंचायतीची नव्याने निर्मिती करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कळवंत वाडी (ता.शिरूर, जि.पुणे) येथील ग्रामपंचायतील गावठाण हद्द, शीव सीमा रेषा हद्द निश्चित होऊन तलाठी सजा उपलब्ध होणेबाबत दिनांक २४ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी यांच्याकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुणे जिल्हयातील नव्याने स्थापन झालेल्या ग्रामपंचायतींना महसूल विभागाकडून शीव सीमा रेषा व गावठाण हद्द निश्चित करून देण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या नवीन ग्रामपंचायतींना महसुली गावांचा दर्जा मिळालेला नसल्याने तलाठी सजाही उपलब्ध नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, पुणे जिल्हयातील नवीन ग्रामपंचायतींना गावठाण हद्द, शीव सीमा रेषा हद्द निश्चित होऊन तलाठी सजा उपलब्ध होणेबाबत शासनस्तरावरून कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२८-०५-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) आंबळे हया गावातून कळवंतवाडी हे गाव स्वतंत्र होण्यासाठी वाडी विभाजन होणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने गावाची मोजणी करणे, गट नंबर एकत्र करणे, दोन्ही गावच्या हद्दी निश्चित करणे, शीव रेषा निश्चित करणे यासाठी उपअधिक्षक, भूमी अभिलेख विभागाकडून प्रस्ताव सादर करण्याची व वाडी विभाजनाची कार्यवाही सुरु आहे.

(४) व (५) पुणे जिल्हयातील नव्याने स्थापन झालेल्या ग्रामपंचायतींना महसूली गावाचा दर्जा देणेबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, पुणे कार्यालयास प्राप्त झालेला नाही.

---

**कल्याण-डोंबिवली शहराबाहेर आगार विकसित करण्यासाठी**
**डेपो पोर्टचा प्रस्ताव तयार करण्याबाबत**

**(२) ६००८६ (२४-०८-२०१६). श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण (जि.ठाणे) रेल्वेस्थानक परिसरातील वाहतुक कोंडी सोडविण्यासाठी एस. टी. बस आागाराचे प्रवेशद्वार बंद करण्याचा महत्त्वाचा निर्णय महामंडळाने घेतला असल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.परिवहन राज्यमंत्री यांनी कल्याण डोंबिवली शहराबाहेर आगर विकसित करण्यासाठी डेपो पोर्टचा प्रस्ताव तयार करण्याबाबत परिवहन अधिकाऱ्यांना आदेश दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने सदर निर्णयाची अंमलबजावणी करण्याबाबत तसेच डेपो पोर्टचा प्रस्ताव तयार करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (११-०५-२०१८) :** (१) कल्याण रेल्वेस्थानक परिसरातील वाहतूक कोंडी कमी करण्याच्या दृष्टीकोनातून कल्याण आगारातील दक्षिण बाजूकडे असलेल्या मोठया नाल्यावर पूल बांधण्याचे प्रस्तावित असून त्या परिसरातून राज्य परिवहन महामंडळाच्या बसेसच्या निर्गमनासाठी आऊट गेट करण्याचे प्रस्तावित आहे.

(२) नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**एस.टी. महामंडळाकडून एस.टी. कर्मचाऱ्यांसाठी**
**रुग्णालय उभारण्याचा घेतलेला निर्णय**

**(३) ९५८०१ (२७-१२-२०१७). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.वैभव पिचड (अकोले), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.अजित पवार (बारामती), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात परिवहन विभाग व एस.टी. महामंडळाच्या संयुक्त विद्यमाने एस.टी. कर्मचाऱ्यांसाठी १०० खाटांचे अत्याधुनिक रुग्णालय तसेच त्यांच्या पाल्यांसाठी ऑटोमोबाईल व मेकॅनिकल अभियंता महाविद्यालय उभारण्याचा निर्णय माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान घेतला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती सदर रुग्णालय व अभियांत्रिकी महाविद्यालय उभारण्यास व प्रत्यक्षात ते कार्यान्वीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२७-०३-२०१८) :** (१) होय.
(२) व (३) रुग्णालय व अभियांत्रिकी महाविद्यालय हे उपक्रम राबविण्यासाठी येणारा खर्च व त्यापासून मिळणारे उत्पन्न याची व्यवहार्यता पडताळून आवश्यकतेनुसार करावा लागणारा खर्च हा अपघात सहाय्यता निधीमधून उपलब्ध करुन देणबाबच्या प्रस्तावास दि.१५.११.२०१७ रोजी शासनाने मंजूरी दिली आहे.

सद्यस्थितीत, सदर प्रकल्प आखणीसाठी तज्ञ सल्लागार संस्थेच्या निवडीबाबतची ई-निविदा प्रक्रिया सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बुलढाणा जिल्हयातील एसटी महामंडळाच्या विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(४) ९५९३६ (२९-१२-२०१७). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा जिल्हयातील एसटी महामंडळाच्या स्थानिक विभागीय अभियंता स्थापत्य कार्यालयात गेली १५ वर्षे आवश्यक पदे रिक्त असल्यामुळे या कार्यालयाचे कामकाज ६ कर्मचा-यांवर सुरु असल्याचे माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे येथील कर्मचा-यांवर अतिरिक्त ताण येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३)असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने निर्णय घेवून सदर कार्यालयात आवश्यक पदभरती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२७-०३-२०१८) :** (१) व (२) होय.

राज्य परिवहन महामंडळाच्या बुलढाणा विभागातील स्थापत्य अभियंता शाखेमध्ये वर्ग-३ या राज्यसंवर्गीय प्रवर्गातील कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) व (विद्युत) या पदांतील मंजूर एकूण ५ पदांपैकी ३ पदे रिक्त असून, सद्यस्थितीत उपलब्ध असलेल्या मनुष्यबळामार्फत दैनंदिन कामकाज करण्यात येत आहे.

(३) सदरची पदे सरळसेवा भरतीने भरण्याबाबतची कार्यवाही अंतिम टप्प्यामध्ये असून वरिष्ठ लिपिक, कारागीर (क) (विजतंत्री) ही पदे खात्याअंतर्गत बढतीद्वारे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नांदेड महागनरपालिकेच्या परिसरात वाहनांच्या माध्यमातून होणारे प्रदूषण

**(५) ९६१९२ (२७-१२-२०१७). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड महागनरपालिकेच्या परिसरात १ लाख २५ हजार वाहनांची वर्दळ असून सुध्दा वाहन प्रदूषण रहित रहावे असा दंडक असला तरी निकष न पाळताच प्रादेशिक परिवहन विभागाकडून पीयूसी दिली जात असल्याने शहरातील वातावरण प्रदुषित करणारी वाहने धावत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती वाहनाच्या माध्यमातून होणारे प्रदूषण रोखण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२५-०४-२०१८) :** (१), (२) व (३) केंद्रीय मोटार वाहन नियम १९८९ च्या नियम ११५ मधील तरतूदीनुसार प्रत्येक वाहनाची वायुप्रदुषणाची पातळी विहित केलेल्या मर्यादेत असणे आवश्यक आहे. तसेच प्रत्येक वाहनधारकास नियम ११५ (७) नुसार वायुप्रदुषण नियंत्रण प्रमाणपत्र सोबत बाळगणे अनिवार्य आहे. सदर प्रमाणपत्र मान्यताप्राप्त केंद्रातून जारी केले जाते. नांदेड कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात १७ मान्यता प्राप्त वायुप्रदुषण नियंत्रण तपासणी केंद्र असून सदर केंद्रामार्फत वाहनातील वायुप्रदूषणाची तपासणी करण्यात येवून प्रमाणपत्रे देण्यात येतात.

राज्यातील सर्व परिवहन कार्यालयात, वाहनांसंदर्भात कोणत्याही कामासाठी अर्ज स्वीकारताना त्यासोबत वाहनाचे वायुप्रदुषण नियंत्रण प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे. उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, नांदेड या कार्यालयाच्या वायुवेग पथकांच्या कारवाई दरम्यान प्रत्येक वाहनाचे वायुप्रदुषण नियंत्रण प्रमाणपत्राची तपासणी करण्यात येते. वरील तरतुदींचा भंग करणाऱ्या वाहनांवर केंद्रीय मोटार वाहन नियम, ११५ नुसार कारवाई करण्यात येते.

एप्रिल, २०१६ ते डिसेंबर, २०१७ या कालावधीत नांदेड जिल्हयातील ५९२८ वाहने तपासण्यात आली असता ९२१ वाहने दोषी आढळून आलेली आहे. यामधील ७७९ प्रकरणे निकाली काढण्यात येवून रू.७,७९,०००/- एवढा दंड वसूल करण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्य परिवहन कार्यालयात नागरी सेवा केंद्र (सीएससी) सुरू करण्याबाबत**

**(६) ९६२२६ (२९-१२-२०१७). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.बंटी भांगडिया (चिमूर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील परिवहन विभागाने सुरू केलेल्या 'सारथी ४.०' व 'वाहन ४.०' या अत्याधुनिक ऑनलाईन प्रणालीमुळे आरटीओ कार्यालयामध्ये गोंधळ सुरू असल्याचे माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रणालीच्या माध्यमातुन ऑनलाईन अर्ज, कागदपत्रे अपलोड शुल्क भरण्याची सध्याची किचकट पध्दत व ई-पेमेंटच्या सक्तीमुळे १५० रूपयाच्या लर्निंग लायसन्सकरीता अतिरिक्त १०० रूपयाचा आर्थिक भुर्दंड परवान्याच्या सेवा मिळविणाच्या नागरीकांवर पडत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य परिवहन कार्यालयानी लर्निंग परवानाकरीता सर्व प्रक्रिया केल्यानंतरही २४ तासाच्या वर वेळ लागत असल्यामुळे परवाना बनविणाऱ्या व्यक्तींना राज्य परिवहन कार्यालयात सारखे जावे  लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्य परिवहन कार्यालयात ऑनलाईन प्रणालीमुळे काम करणे अत्यंत सुलभरित्या व्हावे याकरीता तांत्रिक समस्या सोडविण्याकरीता प्रशिक्षित अधिकारी व कर्मचाऱ्यांची राज्य परिवहन कार्यालयात नियुक्ती व सीएससी सेंटर सुरू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२३-०४-२०१८) :** (१) हे अंशतः खरे आहे. तांत्रिक अडचणी आल्यामुळे काही अर्जदारांचे काम होण्यास विलंब झाला होता.

(२) व (३) हे खरे नाही.

(४) राज्यातील सर्व परिवहन कार्यालयामध्ये सारथी ४.० व वाहन ४.० या अत्याधुनिक ऑनलॉईन संगणकीय प्रणाली कार्यान्वीत करण्यात आलेल्या आहेत. सदरच्या प्रणालीद्वारे पुरविल्या जाणा-या ऑनलाईन सेवा सुलभ होण्याकरिता राष्ट्रीय सुचना केंद्र, पुणे यांनी निक्सी (NICSI) या बाह्य संस्थेमार्फत ४५ रोलआऊट सपोर्ट कर्मचा-यांची नियुक्ती राज्यातील सर्व परिवहन कार्यालयामध्ये केली आहे. तसेच, रु.१००/- इतके शुल्क आकारुन नागरी सेवा केंद्रास (सीएससी) ऑनलाईन फॉर्म भरण्यास मान्यता देण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील परिवहन कार्यालयांमधील उपप्रादेशिक परिवहन अधिकारी व कर्मचारी यांची रिक्त पदे भरण्याबाबत**

**(७) ९६२४४ (२७-१२-२०१७). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील परिवहन कार्यालयांमध्ये १६ उपप्रादेशिक परिवहन अधिकारी व अनेक कर्मचारी यांची पदे रिक्त असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परिवहन कार्यालयांवर अधिकचा भार पडत असून कारभार संथ गतीने चालले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, परिवहन कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांची रिक्त पदे कधीपर्यंत भरण्यात येणार आहेत,

(४) असल्यास, परिवहन कार्यालयाचा कारभार अधिक सुलभ होण्यासाठी व कार्यालयामध्ये येणाऱ्या लोकांना पुरेशा सोयीसुविधा उपलब्ध होण्याबाबत तसेच १६ उपप्रादेशिक परिवहन अधिकारी व अनेक कर्मचारी यांची पदे रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२३-०४-२०१८) :** (१) दि. ३१.१२.२०१७ रोजी राज्यातील मोटार वाहन विभागात एकूण ५१०० अधिकारी व कर्मचा-यांचे पदे मंजूर असून त्यापैकी २२९७ पदे रिक्त आहेत. सध्य:स्थितीत उपप्रादेशिक परिवहन संवर्गातील एकूण ५६ पदे मंजूर असून ०४ पदे रिक्त आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) रिक्त पदे भरण्याची कार्यवाही शासनस्तरावर करण्यात येत असून महाराष्ट्र लोकसेवा आयोगास मागणीपत्रे पाठविण्यात आली आहेत. राज्यातील सर्व परिवहन कार्यालयामध्ये सारथी ४.० व वाहन ४.० या अत्याधुनिक ऑनलाईन संगणकीय प्रणाली तसेच वाहन धारक / अनुज्ञप्ती धारकास शासनाचे www.parivahan.gov.in या संकेतस्थळावरून ऑनलाईन अर्ज भरण्याकरिता सीएससी सेंटर (कॉलसेंटर) इ. योजना कार्यान्वित करुन लोकांना सुविधा उपलब्ध करुन दिल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**महिला परवानाधारकांची रिक्षा पुरुष चालक चालवित असल्याबाबत**

**(८) ९६४५६ (२७-१२-२०१७). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत महिलांना रोजगार उपलब्ध व्हावा यासाठी महिलांना रिक्षा परवान्यात पाच टक्के आरक्षण देवून परवानेही दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या महिला रिक्षाचालकांच्या अबोली रंगाच्या रिक्षा पुरुषच चालवित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती सदर महिलांसाठी असणाऱ्या योजनेचा दुरुपयोग करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०६-०४-२०१८) :** (१) होय.
(२) हे अंशत: खरे आहे.
(३) व (४) परिवहन विभागातर्फे ऑटोरिक्षा वाहन तपासणी वायुवेग पथकामार्फत सतत केली जाते. अशा महिलांसाठी जारी केलेल्या परवान्यावरील ऑटोरिक्षा पुरूष चालक चालवित असल्याचे आढळल्यास तपासणी मोहिमेमध्ये दोषींवर कारवाई करून दंड वसूली, परवाना निलंबन तसेच अनुज्ञप्ती निलंबनाची कारवाई करण्यात येते.

महिला परवानाधारकाची रिक्षा पुरूष चालक चालवित असल्याबाबत प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (पश्चिम/पूर्व) व उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, बोरीवली या कार्यालयात कोणतीही तक्रार प्राप्त झाली नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर जिल्हयातील मच्छीमार संस्थांना तलावाच्या वाटपाबाबत**

**(९) ९६६२५ (२९-१२-२०१७). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर जिल्हयातील मच्छीमार संस्थांना तलावाचे वाटप शासकीय आदेशानुसार नियम व अटींचे पालन करून होत असतांना देखील छोटया २६ तलावांच्या वाटपाची प्रक्रिया राजकीय हस्तक्षेप वाढल्यामुळे अडल्याबाबतची बाब माहे ऑक्टोंबर, २०१७ च्या सुरूवातीस निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या तलावांसाठी आवश्यक असलेले शुल्क मच्छीमार संस्थांनी दिनांक २९ सप्टेंबर, २०१७ रोजी जमा केले होते परंतु त्यामध्ये राजकीय हस्तक्षेप अधिक वाढल्यामुळे त्या संबंधीत संस्थाना वर्क ऑर्डर देण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मच्छीमार संस्थांच्या प्रतिनिधींना तेलंगखेडी, धोतीवाडा, खिडकी, मटकाझरी, खिंडसी, मकरधोकडा या तलावाच्या वाटपासंबंधी सहायक मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी, नागपूर यांनी दिनांक ०५ ऑक्टोंबर, २०१७ रोजी बैठक आयोजित केली परंतु त्यामध्ये सुध्दा राजकीय हस्तक्षेप आणखीच वाढल्यामुळे रद्द करण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मच्छीमार संस्थांच्या प्रतिनिधींना पावसाळयाच्या हंगामात वाटप करण्यात येणाऱ्या तलावाच्या लिलावास बराच विलंब होत असल्यामुळे त्यांना १० हजार रूपयाला मिळणारे मस्त्यबीज ८० ते ९० हजार रूपयांनी विकत घ्यावे लागत असल्यामुळे त्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, चौकशीअंती मच्छीमार संस्थांना तलावाच्या वाटपाच्या प्रक्रियेमध्ये राजकीय हस्तक्षेप करणाऱ्या व्यक्तींच्या कामाची चौकशी करून त्यांच्यावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (२०-०३-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) नागपूर जिल्हयातील ७४ तलावांपैकी १७ तलावांची ठेका मुदत दि. ३० जून २०१६ तर १६ तलावांची ठेका मुदत दि ३० जून २०१७ रोजी समाप्त झाली आहे. या ३३ तलावांपैकी ३० तलाव ठेकेधारकांना वर्क ऑर्डर देण्यात आल्या असून त्यापैकी २९ ठेकेधारकांनी रकमेचा भरणा केलेला आहे. उर्वरीत एका ठेकेधारकाला रकमा भरणा करण्याबाबत कळविले आहे.
(३) तेलंगखेडी, धोतीवाडा, खिडकी, मटकाझरी, खिंडसी, मकरधोकडा या तलावाच्या वाटपासंबंधी जिल्हास्तरीय तलाव ठेका समितीची बैठक दि. ०६.१०.२०१७ रोजी आयोजित करण्यात आली होती. मात्र सदर दिवशी मा. पालकमंत्री नागपूर जिल्हा यांचेकडे अन्य बैठक आयोजित करण्यात आल्याने तलाव ठेका बैठक पुढे ढकलण्यात येवून सदर बैठक दिनांक १०/१०/२०१७ रोजी घेण्यात आली आहे.
(४) हे खरे नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कृषी सहाय्यकांच्या मागण्या मान्य करण्याबाबत.

**(१०) ९६७०२ (२७-१२-२०१७). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्य कृषी सहाय्यक संघटनेने दिनांक १२ जुलै, २०१७ रोजी वा त्यासुमारास कृषी आयुक्त, पुणे यांच्यासोबत प्रलंबित मागण्यांबाबत निवेदन देवून बैठक घेतली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कृषी आयुक्तांनी बैठकीत दिलेल्या आश्वासनांपैकी कोणत्याही आश्वासनाची अद्याप पुर्तता झाली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने कृषी सहाय्यकांच्या मागण्या मान्य करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (१३-०३-२०१८) :** (१) महाराष्ट्र राज्य कृषि सहाय्यक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची बैठक दि.१३ जुलै, २०१७ रोजी आयुक्त (कषि) यांचे अध्यक्षतेखाली घेण्यात आली होती.

(२), (३) व (४) हे खरे नाही.

कृषि सहाय्यक व कृषि पर्यवेक्षक संवर्गाचे सुधारित सेवा प्रवेश नियम-२०१८ दि.२९ जानेवारी, २०१८ रोजी अधिसूचित करण्यात आलेले आहेत. वित्त विभागाच्या मार्गदर्शक सुचनांप्रमाणे कृषि विभागाचा सुधारित आकृतीबंध तयार करुन वित्त विभागाच्या मान्यतेस सादर करण्यात आलेला आहे, कृषि सेवक पदाचा ३ वर्षाचा कंत्राटी सेवेचा कालावधी हा शिक्षण सेवकाप्रमाणे आश्वासित प्रगती योजना व इतर सर्व लाभांसाठी ग्राहय धरण्याबाबत शासनस्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नेवासा (जि.अहमदनगर) तालुक्यातील कमी पावसामुळे पिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना अनुदानाचे वाटप करण्याबाबत**

**(११) ९७४५७ (२९-१२-२०१७). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हयात सन २०१५ मध्ये झालेल्या कमी पावसामुळे खरीप व रब्बी पिकांचे नुकसान झालेल्या बाधित शेतकऱ्यांना माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान प्राप्त झालेल्या १३३ कोटी १३ लाख रुपयांच्या अनुदानाचे नेवासा तालुक्यासाठी ५४ कोटीचे अद्यापही वाटप करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती प्राप्त झालेल्या अनुदानाचे नेवासा तालुक्याला वाटप करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०९-०३-२०१८) :** (१) हे खरे नाही.

विभागीय आयुक्त, नाशिक यांनी दिनांक २९ एप्रिल, २०१७ अन्वये रब्बी हंगाम सन २०१५ करीता रक्कम रुपये १३३.१३ कोटी इतके अनुदान अहमदनगर जिल्हयाकरीता अर्थसंकल्पीय प्रणाली (BDS) द्वारे उपलब्ध करुन दिलेले आहे. सदर अनुदान दिनांक २९ एप्रिल, २०१७ रोजीच्या आदेशान्वये तहसिलदार, नेवासा यांना रुपये ५४,१८,०४,३९६/- वितरीत करण्यात आलेले आहे.

नेवासा तालुक्यातील ५ मंडळातील ६० गावातील हरभरा पिकाच्या यादया प्राप्त करुन घेऊन त्यामधून पिक विमा धारकाचे नावे वगळून उर्वरित ४९०० इतक्या शेतकऱ्यांचा खात्यावर रक्कम रुपये १२,६३,४९९/- इतकी रक्कम वर्ग करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खिंडसी तलाव (ता.रामटेक, जि.नागपूर) स्थानिक मासेमारी संस्थांना देण्याबाबत**

**(१२) ९८४५२ (२७-१२-२०१७). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खिंडसी तलाव (ता.रामटेक, जि.नागपूर) स्थानिक मासेमारी संस्थांना मासेमारी करण्याकरिता देण्याबाबतचे प्रकरण प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मासेमारी करण्याकरिता परवानगी नसल्याने त्यांचेवर उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाकडून मासेमारीची परवानगी मिळण्यास किती अवधी लागेल,

(४) असल्यास, परवानगी मिळण्यास उशीर होत असल्याने त्यांचेकरिता रोजगाराचा मार्ग उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (१२-०३-२०१८) :** (१) फिशरमन मल्टीपर्पज को-ऑप. सोसा. ने मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ नागपूर येथे खिंडसी तलावाबाबत रिट याचिका क्र. ६८७२/२०१७ दाखल केली आहे. सदर रिट याचिका ही मा. उच्च न्यायालयात प्रलंबित असून पुढील तारीख २६ फेब्रुवारी, २०१८ आहे.

(२) हे खरे नाही.

(३) सदर तलावाबाबतची मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ नागपूर येथे दाखल केलेली रिट याचिका क्र.६८७२/२०१७ निकाली निघाल्यावर तलाव ठेक्याने देण्याची कार्यवाही सुरु करता येईल.

(४) मा.उच्च न्यायालयाने खिंडसी तलाव ठेक्याने देण्याच्या कार्यवाहीस स्थगिती दिली आहे. त्यामुळे सदर स्थगिती दरम्यान मच्छिमारांनी मासेमारी परवानेसाठी अर्ज केल्यास त्यांना तात्काळ मासेमारी करण्याचे परवाने उपलब्ध करून देण्यात येतील.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजनेच्या निकषामध्ये राज्यातील नगरपालिका क्षेत्रातील शेतकऱ्यांचा समावेश करण्याबाबत**

**(१३) ९९३३१ (२७-१२-२०१७). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजनेच्या निकषामध्ये राज्यातील नगरपालिका क्षेत्रातील शेतक-यांचा समावेश होणेकरिता धोरणात्मक निर्णय घेण्याबाबतचे लेखी निवेदन लोकप्रतिनिधीनी मा.कृषि मंत्री यांना दिनांक १९ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजनेच्या निकषामध्ये राज्यातील नगरपालिका क्षेत्रातील शेतकऱ्यांचा समावेश करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (२३-०३-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय.
(३) व (४) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ प्रशासकीय क्षेत्रे ४ (१) नुसार जिल्हा परिषद व पंचायत समितीचे कार्यक्षेत्र महानगरपालिकेच्या, नगरपालिकेच्या हद्दी वगळून असल्यामुळे पंचायत समिती स्तरावरुन सदर क्षेत्रातील शेतकऱ्यांना लाभ देणे अडचणीचे ठरते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजनेच्या निकषामध्ये राज्यातील नगरपालिका क्षेत्रातील शेतकऱ्यांचा समावेश होणेकरिता धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी राज्यामध्ये नगरपंचायत व महानगरपालिका क्षेत्रामध्ये किती हेक्टर क्षेत्र येते याबाबतची माहिती जिल्हा परिषदेच्या अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडून कृषि आयुक्त स्तरावर संकलित करण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

### चांदूर बाजार (जि.अमरावती) तालुक्यातील राज्य स्तरीय पशुवैद्यकीय दवाखान्याची नवीन इमारत बांधण्याबाबत

**(१४) १००४८८ (२७-१२-२०१७). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तळेगाव मरेना व कुरळपुर्णा तसेच कु-हा व तोंडगाव (ता.चांदूर बाजार, जि.अमरावती) येथील राज्य स्तरीय पशुवैदकीय दवाखाने ज्या इमारतीमध्ये चालतात त्या जीर्ण झाल्यामुळे नवीन इमारत तातडीने बांधण्यात याव्यात अशी मागणी मा.पशुसंवर्धन मंत्री यांचेकडे दिनांक १९ मे, २०१७ रोजी वा त्या सुमारास केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, उक्त पशुवैद्यकिय दवाखान्यांची जीर्ण झालेल्या इमारती तातडीने बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (०९-०३-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) चांदूर बाजार तालुक्यातील तोंडगाव, तळेगांव मोहना, कुऱ्हा व कुरळपर्णा येथील पशुवैद्यकीय दवाखाने श्रेणी-१ च्या इमारतींचे बांधकाम करण्याकरीता कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अचलपूर, जि.अमरावती यांनी अंदाजपत्रके तांत्रीक मंजूरीसह दिली असून त्यानुसार सदर प्रस्तावास प्रशासकीय मंजूरी देण्यात आलेली आहे.

राज्यस्तरीय पशुवैद्यकीय दवाखाना तळेगांव मोहना व कुऱ्हा येथे नविन इमारत बांधकामाकरिता रू.८१,१२०००/- एवढ्या रकमेस प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. त्यापैकी ५० टक्के रक्कम सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग करण्यात आली असून बांधकामाबाबतच्या निविदा प्रक्रीया सार्वजनिक बांधकाम विभागाच्या स्तरावर सुरू करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मालवण-आचरा (जि.सिंधुदुर्ग) मार्गावर कुडोपी-मालवण एसटीला धडक दिल्याने दुचाकीस्वाराचा झालेला मृत्यू**

**(१५) १००५५८ (०६-०१-२०१८). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालवण-आचरा (जि.सिंधदुर्ग) मार्गावरून मालवणच्या दिशेने येणाऱ्या मालवण आगाराच्या कुडोपी-मालवण एसटीला हडी येथील डोणी बसथांब्या समोरून येणाऱ्या दुचाकीने धडक दिल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर दुर्घटनेतील दुचाकीस्वाराच्या डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने अतिरक्तस्त्रावाने त्याचा जागीच मृत्यू झाला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त दुर्घटनेची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१०-०४-२०१८) :** (१) व (२) होय.

दि.२७.१०.२०१७ रोजी राज्य परिवहन महामंडळाच्या मालवण आगाराची बस क्र.एम.एच. २० बी.एल. १२०९ ही बस कुडोपी-मालवण या मार्गावर धावत होती. सदरची बस हडी-डोणी थांब्यावर आली असता, समोरुन येणाऱ्या ओमनी गाडीला मोटार सायकल क्र.एम.एच. ०७ यु ६७४८ ही ओव्हरटेक करत असताना महामंडळाच्या बसच्या पुढील बंपरला आदळून प्राणांतिक स्वरुपाचा अपघात झाला, सदर अपघातामध्ये मोटार सायकल चालक श्री.अखिलेश कुमार तेरस, वय २० यांचा जागीच मृत्यु झाला आहे.

(३) व (४) सदर अपघाताची चौकशी मालवण पोलीस स्टेशन यांचेकडून करण्यात आलेली असून, त्यामध्ये सदर अपघातास मोटार सायकल चालक जबाबदार आढळून आल्याने त्यांच्यावर भा.दं.वि.कलम ३०४ ए., २७९, ३३७ व ३३८ अंतर्गत मोटार वाहन कायदा कलम १९४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पिकांच्या विकासासाठी सहाय्यभूत ठरणारे नोंदणीकृत**
**पिकवाढ संजीवके यांना परवानगी देण्याबाबत**

**(१६) १०१२९५ (२७-१२-२०१७). श्री.अनिल कदम (निफाड), श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिकांच्या विकासासाठी सहाय्यभूत ठरणारे नोंदणी कृत पिकवाढ संजीवके यांना परवानगी देण्यासाठी समिती स्थापन करणेबाबतचा दिनांक १६ ऑक्टोबर, २०१० रोजीचा शासन निर्णय रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पिकांच्या विकासासाठी सहाय्यभूत ठरणारे व शेतकऱ्यांची मोठी मागणी असणारे संजीवके परवाने रद्द करणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संजीवके यांचे परवाने रद्द केल्यामुळे पिकांचा घसरणारा दर्जा व कोसळणारे बाजारभाव ह्यामुळे शेतकऱ्यांचे होणारे नुकसान टाळण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (२०-०३-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) कृषि निविष्ठा कायद्यामध्ये समाविष्ट नसलेल्या बिगर नोंदणीकृत पिक वाढ संजीवके व इतर उत्पादनांना नियमानुसार परवाना देता येत नसल्याने, शासनाने कृषि विभागाच्या परवानाधारक दुकानांमधून अशा उत्पादनांच्या विक्रीस, दिनांक ०३/१०/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रतिबंध घातलेला आहे. अशा उत्पादनांना उत्पादन, विक्री, वितरण व साठवण परवाने देण्याचा अथवा असे परवाने रद्द करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही अशा उत्पादनांची विक्री कृषी विभागाच्या परवानाधारक दुकानांव्यतिरिक्त कंपनीची विशेष स्वरुपाची दुकाने स्थापून त्यामधून करता येवू शकेल.

(३) कृषी निविष्ठा कायदयामध्ये समाविष्ट नसलेल्या बिगर नोंदणीकृत पीक वाढ संजीवके व इतर उत्पादनांची विक्री, कृषि विभागाच्या परवानाधारक दुकानांव्यतिरिक्त कंपनीच्या विशेष स्वरुपाच्या दुकानांमार्फत करण्याची मुभा आहे त्यास शासनाने प्रतिबंध घातलेला नाही. त्यामुळे, गरजेनुसार शेतकरी अशा दुकानांमधून कृषि निविष्ठांची खरेदी करु शकतात.

त्याशिवाय, केंद्र शासनाने उत्पादन नोंदणीसंदर्भात National Centre Of Organic Farming, Department of Agriculture and Co-operation, Ministry of Agriculture, Government of India, CGO- II, Kamala Nehru Nagar, Gaziabad- २०१००१, Uttar Pradesh यांनी Biofertilizers and Organic Fertilizers in Fertilizer (Control) Order, १९८५ हे आदेश मार्च, २००६ आणि नोव्हेंबर, २००९ मध्ये सुधारित करुन काढलेले आहेत. या प्रचलित पध्दतीनुसार नोंदणी झाल्यास पिकवाढ संजीवकांचा दर्जा उत्तम राहील व चांगले पिक शेतकऱ्यांस मिळेल. तसेच, शेतकऱ्यांची फसवणूक व दिशाभूल होणार नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पेण (जि.रायगड) येथील उपप्रादेशिक परिवहन विभागातील पदे भरण्याबाबत**

**(१७) १०१३३६ (२७-१२-२०१७). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेण (जि.रायगड) उपप्रादेशिक परिवहन विभागातील १ उपप्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यासह ५१ पदे मंजूर असताना केवळ २८ पदे भरली असून एकूण २३ अधिकारी व कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असल्यामुळे परिवहन विभागाच्या कामात अनेक अडचणी निर्माण होत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पेण उपप्रादेशिक परिवहन विभाग कार्यालयाचा कार्यभार वाढल्याने पनवेल येथे स्वतंत्र कार्यालय सुरू करण्यात आले असून दोन्ही ठिकाणी अधिकारी व कर्मचाऱ्यांची कमतरता जाणवत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, परिवहन विभाग हा मोठ्या प्रमाणावर महसूल मिळवून देणारा विभाग असून अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या रिक्त पदांमुळे शासनाचा मोठयाप्रमाणात महसुल बुडत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून महसुलात वाढ होण्यासाठी अधिकारी व कर्मचा-यांची रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२२-०३-२०१८) :** (१) व (२) प्रादेशिक परिवहन कार्यालय, पनवेल या कार्यालयाची निर्मिती दि.१७.०८.२०१० रोजीच्या शासन आदेशान्वये करण्यात आली आहे. दिनांक ३१.१२.२०१७ रोजी उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, पेण येथे एकुण ६७ मंजूर पदांपैकी ३० पदे रिक्त असून प्रादेशिक परिवहन कार्यालय, पनवेल येथे एकुण ६९ मंजुर पदांपैकी १९ पदे रिक्त आहेत.

(३) हे खरे नाही.

(४) रिक्त पदे भरण्याची कार्यवाही शासनस्तरावर करण्यात येत असून महाराष्ट्र लोकसेवा आयोगास मागणीपत्रे पाठविण्यात आली आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रा.राहेरी बु, (ता.सिंदखेड राजा, जि.बुलढाणा) येथील शेतकऱ्यांना झालेल्या नुकसानीचा प्रधानमंत्री पीक विमा मिळणेबाबत**

**(१८) १०१५९९ (२७-१२-२०१७). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रा.राहेरी बु, (ता.सिंदखेड राजा, जि.बुलढाणा) येथील श्री.सुभाष मानसिंगराव देशमुख, विठठल शंकरराव देशमुख, पंढरीनाथ मधुकरराव देशमुख, पवन आबासाहेब सरकटे या शेतकऱ्यांनी सन २०१६-२०१७ या कालावधीमध्ये झालेल्या नुकसानीचा रिलायन्स इन्शुरन्स कंपनीकडून प्रधानमंत्री पीक विमा मिळणेबाबत तहसिलदार, सिंदखेडराजा, जिल्हाधिकारी, बुलढाणा, कृषी अधिकारी, बुलढाणा, मा.कृषी मंत्री तसेच पालकमंत्री आदिकडे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान पत्रव्यवहार करुनही अदयाप कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती उक्त नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना त्वरित प्रधानमंत्री पीक विमा मिळणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (२६-०३-२०१८) :** (१) हे खरे नाही.

प्रधानमंत्री पिक विमा योजना खरीप हंगाम २०१६ अंतर्गत श्री सुभाष मानसिंगराव देशमुख, विठ्ठल शंकरराव देशमुख, पंढरीनाथ मधुकरराव देशमुख, पवन आबासाहेब सरकटे या शेतकऱ्यांचे स्थानिक नैसर्गिक आपत्ती अंतर्गत नुकसान भरपाईबाबतचे प्रस्ताव जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, बुलढाणा यांचेमार्फत दिनांक १.०२.२०१७ रोजी रिलायन्स इन्शुरन्स कंपनीकडे पाठविण्यात आले.

(२) होय.

(३) सदर प्रकरणी प्राप्त अहवालानुसार उपरोक्त शेतकऱ्यांचे स्थानिक नैसर्गिक आपत्ती अंतर्गत नुकसान भरपाईबाबत प्रस्तावांमध्ये नुकसानीचे कारण अति पाऊस/पाणी साचल्याने पिक नष्ट झाले असे नमुद केले आहे.

योजनेच्या मार्गदर्शक सुचनेनूसार अतिवृष्टीमुळे पिकांचे झालेले नुकसान हे स्थानिक नैसर्गिक आपत्ती या बाबी अंतर्गत समाविष्ट नाही. त्यामुळे सदर शेतकऱ्यांना स्थानिक नैसर्गिक आपत्ती अंतर्गत वैयक्तिक स्तरावर नुकसान भरपाई देय होत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाडा (जि.पालघर) येथील वाडा पंचायत समितीच्या गोदामामध्ये आणि शेतकरी निवासस्थानी ठेवलेल्या रासायनिक खतांबाबत**

**(१९) १०१७७५ (२७-१२-२०१७). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाडा (जि.पालघर) येथील ठाणे जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या समोर असलेल्या वाडा पंचायत समितीच्या गोदामामध्ये आणि शेतकरी निवासस्थानी ठेवलेले रासायनिक खत शेतकऱ्यांना वाटप न करता तसेच पडून असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती ठाणे जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या समोर असलेल्या वाडा पंचायत समितीच्या गोदामामध्ये आणि शेतकरी निवासस्थानी ठेवलेले रासायनिक खत शेतकऱ्यांना वाटप न करता तसेच पडून ठेवलेल्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (०७-०३-२०१८) :** (१) होय. हे खरे आहे.
(२) होय. प्राथमिक चौकशी केली आहे.
(३) आदिवासी उपयोजनेंतर्गत निवडलेल्या ४१५ लाभार्थ्यांपैकी ७ लाभार्थी शेतकऱ्यांनी रासायनिक खत माहे ऑक्टोबर, २०१७ पर्यंत उचल न केल्याने साठा शिल्लक होता. माहे डिसेंबर, २०१७ अखेर निवड केलेल्या सर्व लाभार्थ्यांनी खत उचल केल्याने ऑक्टोबरमध्ये शिल्लक साठ्याचे वाटप पूर्ण झाले आहे. त्यामुळे कोणावरही कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**काळी-पिवळी टॅक्सी, रिक्षा यांच्या प्रवासासंदर्भात खटुआ समितीने सादर केलेल्या अहवालाबाबत**

**(२०) १०२१९५ (२७-१२-२०१७). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेतील काळी-पिवळी टॅक्सी व रिक्षा यांच्या प्रवासाकरीता प्रवाशांना सवलत मिळावी यासाठी खटुआ समितीने आपला अहवाल माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यासुमारास सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास,चौकशीअंती अहवालातील शिफारशींचे स्वरुप काय आहे तसेच भाडे नाकारणाऱ्या प्रकारांना आळा बसण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (३१-०३-२०१८) :** (१), (२) व (३) राज्यातील ऑटोरिक्षा/टॅक्सीचे भाडेदर सूत्र विहीत करण्याकरीता दि.१३.०४.२०१२ च्या शासन निर्णयान्वये श्री.पी.एम.हकीम यांच्या अध्यक्षतेखालील समितीने सादर केलेल्या अहवालानुसार भाडेदर व प्रत्यक्ष भाववाढ यांचा तुलनात्मक पुनर्विचार करुन बदललेल्या परिस्थितीनुरुप शिफारशी करण्याकरीता शासनाने दि.१०.१०.२०१६ चे शासन निर्णयान्वये राज्यातील ऑटोरिक्षा/टॅक्सींचे भाडेदर सुत्र विहित करण्याकरीता श्री.बी.सी. खटुआ, संचालक, मुंबई ट्रान्सफॉर्मेशन सपोर्ट युनिट यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली होती.

तद्नंतर उक्त समितीस महाराष्ट्र सिटी टॅक्सी नियम-२०१७ च्या नियम ११ नुसार राज्यात समुच्चयक टॅक्सींचे कमाल व किमान भाडेदर सुत्र निश्चित करण्याचे कामकाज दि.०३.०६.२०१७ चे शासन निर्णयान्वये सोपविण्यात आले. त्यानुसार सदर समितीने त्यांचा अहवाल दि.०९.१०.२०१७ रोजी शासनास सादर केला असून सदर अहवालान्वये टॅक्सी व ऑटोरिक्षा वाहन प्रवासाकरिता रास्त व वाजवी भाडे दररचनेची शिफारस केली आहे. तसेच दरसूत्र प्रस्तावित केले आहे.

भाडे नाकारण्याच्या प्रकारांना आळा घालण्याकरिता सदर समितीने जिल्हा स्तरावर पोलीस अधिक्षक यांच्या तसेच आयुक्तालय स्तरावर पोलीस सह आयुक्त/उपायुक्त यांचे अध्यक्षतेखाली समिती नेमून त्यावर मोटार वाहन विभाग, वाहतूक पोलीस, टॅक्सी रिक्षा संघटना, ग्राहक मंच, न.प./म.न.पा. व प्रसार माध्यमे यांचे प्रतिनिधी नियुक्त करून दरमहा बैठक आयोजित करून समकक्ष विषयाच्या अनुषंगाने ग्राहकाभिमुख अंमलबजावणीविषयक निर्णय राबवावेत अशी शिफारस केली आहे.

अहवालातील शिफारशींवर निर्णय घेण्याची बाब शासनाच्या कार्यवाहीखाली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**केदारखेडा (ता.भोकरदन, जि.जालना) येथील पशुधन पशुवैद्यकीय दवाखान्यातील पदे भरण्याबाबत**

**(२१) १०३३८० (२९-१२-२०१७). श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केदारखेडा (ता.भोकरदन, जि.जालना) येथील पशुधन पशुवैद्यकीय दवाखान्यात पशुधन पर्यवेक्षक नसल्याने पशुपालकांची गैरसोय होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आजारी पशुधनाला उपचारासाठी खाजगी पशुवैद्यकीय तज्ज्ञांकडे घेवुन जावे लागते किंवा आजारी जनावरे उपचाराविना परत जातात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पशुधन पर्यवक्षकाची पदे व अन्य पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (१२-०३-२०१८) :** (१), (२) व (३) अंशत: खरे आहे.

१) केदारखेडा, ता.भोकरदन, जि.जालना येथील पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-२ येथे पशुधन पर्यवेक्षकाचे १ पद मंजूर असून सदर पद सध्या रिक्त आहे.

२) सदर पदाचा अतिरिक्त कार्यभार सिपोरा येथील पशुधन पर्यवेक्षक यांच्याकडे सोपविण्यात आलेला असून, पशुवैद्यकीय सेवेचे कामकाज सुरळीत सुरू असून कोणत्याही पशुपालकांची अद्याप गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक जिल्ह्यातील मनमाड, मालेगाव व देवळा येथील बसस्थानकांची झालेली दुरवस्था**

**(२२) १०३७८१ (२९-१२-२०१७). डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील मनमाड येथील बसस्थानकावर अस्वच्छता असल्याचे तसेच मालेगाव येथील नवीन बस स्थानकाच्या इमारतीचा स्लॅबचा स्तर कोसळल्याने दोन प्रवाशी जखमी झाल्याचे व देवळा बस स्थानकावरील शौचालयांची दुरवस्था झाल्याचे माहे ऑगस्ट-सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती उक्त बसस्थानकातील अस्वच्छता, दुर्गंधी, खड्डे, इमारतीचे नुतनीकरण, स्वच्छतागृहांची तातडीने दुरुस्ती या सर्व बाबी तातडीने पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०६-०३-२०१८) :** (१), (२) व (३) राज्य परिवहन महामंडळाच्या नाशिक विभागातील मनमाड बसस्थानकाची दैंनदिन स्वच्छता करण्यात येत असून, वाहनतळावरील खड्डे बुजविण्यात आले आहेत. तसेच, बसस्थानकाचे नुतनीकरण करण्यासाठीच्या निविदा मागविण्यात आल्या आहेत.

पावसामुळे मालेगांव येथील नवीन बसस्थानकातील इमारतीच्या छताचा ३X३ फुट एवढा प्लास्टरचा तुकडा निखळला व त्याचे तुकडे खालून जाणाऱ्या दोन अंध व्यक्तींच्या डोक्यावर पडून त्यांच्या डोक्याला जखमा झाल्या होत्या. सदर जखमी व्यक्तींना सामान्य रुग्णालय मालेगांव येथे दाखल करुन, राज्य परिवहन महामंडळाद्वारे प्राथमिक तात्काळ आर्थिक मदत म्हणून प्रत्येकी रु.१०००/- व 'पी' फॉर्म देण्यात आला आहे. सदर घटनेची नोंद पोलिस स्टेशन मालेगांव येथे करण्यात आलेली आहे. मालेगांव येथील बसस्थानकावरील खड्डे बुजविण्यात आलेले आहेत.

देवळा येथील बसस्थानकाची दैनंदिन स्वच्छता करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्य परिवहन महामंडळाच्या आगारांमधील नादुरुस्त गाड्यांची योग्य प्रकारे दुरुस्ती करून वापरात आणण्याबाबत**

**(२३) १०४११५ (२९-१२-२०१७). श्री.शिवाजीराव कर्डिले (राहुरी), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य परिवहन महामंडळाच्या आगारांमध्ये पुरेसे यांत्रिकी कर्मचारी नसल्यामुळे एसटीच्या ताफ्यातील १८ हजार ६१५ बसेसपैकी तब्बल ७ हजार गाड्या नादुरुस्त झाल्याचे माहे नोव्हेंबर २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रत्येक कार्यशाळा व आगारांमध्ये कुशल कर्मचाऱ्यांअभावी अवघ्या १० मिनिटांमध्ये बसची तात्पुरती देखभाल व दुरुस्ती करून बसेस पाठविल्या जात असतात, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू गाड्यांची योग्य प्रकारे दुरुस्ती करून वापरात आणण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०६-०३-२०१८) :** (१), (२) व (३) राज्य परिवहन महामंडळामध्ये मंजूर यांत्रिक पदांपैकी ८७९८ कर्मचाऱ्यांची कमतरता आहे. सदरची कमतरता भरुन काढण्यासाठी महामंडळाद्वारे भरतीप्रक्रीया सुरु करण्यात आली आहे.

सद्यस्थितीत महामंडळाकडे एकूण १८७८३ वाहने आहेत. त्यापैकी फक्त १४७२ वाहनांची विभागीय कार्यशाळांमध्ये आरटीओ पासींग, पुन:स्थितीकरण, इंजिन बदली, अपघात दुरुस्ती इत्यादी कामे सुरु आहेत. सदरहू कामे पुर्ण होताच गाडया पुन्हा चालनात आणल्या जात आहेत.

राज्य परिवहन महामंडळाच्या वाहनांच्या देखभालीमध्ये दैनिक तपासणी, दशदिनी तपासणी, डेपो डॉकींग, पासींग, पुन:स्थितीकरण इ. बाबींचा समावेश आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### बोंड अळी व ओखी वादळात नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देणेबाबत

**(२४) १०४८६५ (०१-०४-२०१८). श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.गणपतराव देशमुख (सांगोले), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.किशोर पाटील (पाचोरा), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.अनिल कदम (निफाड), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.संतोष दानवे (भोकरदन), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.नारायण पाटील (करमाळा), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), प्रा.विरेंद्र जगताप**

**(धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.रणजीत कांबळे (देवळी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कापसावरील बोंड अळीमुळे नुकसान झालेल्या कापूस उत्पादक, मावा आणि तुडतुडे यामुळे नुकसान झालेल्या धान उत्पादक व ओखी वादळात नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना व मच्छिमार बांधवांना नुकसान भरपाई देण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे २४२५ कोटी रुपयाचा मदतीचा प्रस्ताव पाठविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनाने हिवाळी अधिवेशनामध्ये राष्ट्रीय आपत्ती निवारण विभागाच्या (एन.डी.आर.फ) निकषानुसार पिकांना मदत दिली जाईल असे जाहीर केले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती केंद्र शासनाकडून मिळालेली मदत शेतकऱ्यांना वाटप करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२६-०४-२०१८) :** (१) होय. परंतु शासनाने दिनांक २६.०३.२०१८ रोजीच्या पत्रान्वये रु. ३३७३.३१ कोटी निधी मागणीचा सुधारीत प्रस्ताव केंद्र शासनास पाठविला आहे.

(२) व (३) होय. यासंदर्भातील आदेश दिनांक १७.०३.२०१८ च्या शासन निर्णयानुसार निर्गमित केले आहेत.

(४) केंद्र शासनाकडून अद्याप निधी प्राप्त झालेला नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**एस टी महामंडळाने केलेल्या कामाची, खर्चाची तसेच घेतलेल्या निर्णयाची श्वेतपत्रिका काढण्याबाबत**

**(२५) १०५१०७ (०१-०४-२०१८). श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यमार्ग परिहवन महामंडळाने एसटी तोटयात आहे हे कारण देत कामगारांचा वेतनवाढ प्रस्ताव नामंजुर केला मात्र एसटी तोट्यात असताना विविध कामाच्या नावाखाली महामंडळाकडून अवास्तव खर्च करण्यात असल्याने या सर्व खर्चाची श्वेतपत्रिका काढण्याची मागणी एसटी वर्कस कॉंग्रेस कडून करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एसटी महामंडळाने मराठी भाषा दिन १०० कोटी, गणवेश ७३ कोटी, स्थारक आगार स्वच्छता ४३७ कोटी व वायफाय ५० कोटी आदी योजनांसाठी खर्च केलेले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, एसटी महामंडळात इलेट्रॉनिक मशिन तिकिटांसाठी खासगी कंपनीला मुदतवाढ देण्यात आल्याने पूर्वी प्रति तिकिटासाठी २१ पैसे द्यावे लागत होते मात्र मुदतवाढीनंतर ३३ पैसै महामंडळ देणार असल्यामुळे २०० कोटीचा अतिरिक्त भार सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, चौकशीअंती या सर्व बाबींच्या अनुषंगाने श्वेतपत्रिका काढण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१०-०४-२०१८) :** (१) नाही.
(२) राज्य परिवहन महामंडळाद्वारे मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्याकरीता सन २०१६-१७ मध्ये एकूण रु.१६,९०,३४७/- एवढा खर्च करण्यात आला आहे. तसेच, गणवेश खरेदीसाठी सन २०१७-१८ व २०१८-१९ या दोन आर्थिक वर्षामध्ये रु.६५ कोटी एवढा खर्च केलेला आहे.

राज्य परिवहन महामंडळाची बसस्थानके, कार्यालये व बसेसच्या स्वच्छतेसाठी राज्यस्तरावर ३ वर्षासाठी रु.४४७ कोटीचे काम खाजगी कंपनीस देण्यात आले आहे. तथापि, महामंडळाने वायफाय योजनेसाठी कोणताही खर्च केलेला नसून, उलट सेवापुरवठादार संस्थेने महामंडळास महसूल दिला आहे.
(३) व (४) सन २००८ साली एस.टी. महामंडळात “बांधा, वापरा व हस्तांतरीत करा” या तत्वावर प्रवाशांना तिकीटे देण्यासाठी ईटीआयएम वापराचा व आगाऊ आरक्षण प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यासाठी मे.ट्रायमॅक्स इन्फ्रास्ट्रक्चर ॲण्ड सर्व्हीसेस लि. या सेवापुरवठादाराची नेमणूक २१ पैसे प्रति तिकीट दराने करण्यात आली. सदर प्रकल्पाचा कालावधी डिसेंबर, २०१४ मध्ये संपल्यानंतर प्रकल्पाची गरज विचारात घेऊन सेवापुरवठादार कंपनीस प्रती तिकीट २१ पैसे दराने मुदतवाढ देण्यात आली. दरम्यानच्या काळात नवीन प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यासाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात आली व प्रक्रियेअंती मे.ट्रायमॅक्स इन्फ्रास्ट्रक्चर ॲण्ड सर्व्हीसेस लि.यांची बांधा, वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर अंमलबजावणी करण्यासाठी रु.३३.८० पैसे प्रती बीओटी तिकीट दराने नव्याने नियुक्ती करण्यात आली. जुन्या व नवीन प्रकल्पातील कामाची व्याप्ती व वैशिष्टये वेगवेगळी असून त्यांची तुलना करणे संयुक्तीक होणार नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मुक्त रिक्षा परवान्याचे धोरणाबाबत

**(२६) १०६२५९ (०१-०४-२०१८). श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.संजय पुराम (आमगाव), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्रीमती संगीता ठोंबरे (केज), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), ॲड.पराग अळवणी**

**(विलेपार्ले), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने गेल्या काही वर्षांपासून मुक्त रिक्षा परवान्याचे धोरण अवलंबिले असून हे परवाने सुरु करताना गरजू व बेरोजगारांना तसेच स्थानिकांना प्राधान्य मिळावे यासाठी १५ वर्ष वास्तव्याची अट घातली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परराज्यातून आलेल्या असंख्य परप्रांतियांनी राज्यात एक ते दोन वर्ष राहिले असतानाही दलालांच्या सहकार्याने व बनावट कागदपत्रांद्वारे शाळेचे दाखले, रेशनकार्ड सादर करून स्थानिक वास्तव्याचे दाखले मिळविले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत कोकण रिजन रिक्षा-टॅक्सी महासंघाने चौकशीची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी सखोल चौकशी करून संबंधीत दलाल व बनावट परवानाधारक परप्रांतियांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१६-०४-२०१८) :** (१), (२) व (३) हे खरे आहे.

(४) ऑटोरिक्षा परवाना प्राप्त करण्यासाठी अर्जदाराने बॅज धारण करणे अनिवार्य असून बॅज प्राप्त करण्यासाठी १५ वर्षे अधिवासाची अट आहे. असे दाखले मुलत: महसूल विभागाने जारी करणे अभिप्रेत असल्याने कोकण रिजन रिक्षा-टॅक्सी महासंघ यांनी प्रादेशिक परिवहन कार्यालय, ठाणे यांचेकडे केलेला तक्रार अर्ज, मूळ प्रमाणपत्रे पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी महसूल विभागाकडे वर्ग करण्यात आलेले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्य परिवहन महामंडळाच्या पुणे विभागातील एस.टी पासिंग करण्याबाबत

**(२७) १०६३९२ (०१-०४-२०१८). प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्रवाशांची जीवनवाहिनी असलेल्या एसटीसाठी उच्च न्यायालयाने फिटनेस टेस्ट ट्रक उपलब्ध असल्याशिवाय एसटीचे पासिंग करता येणार नसल्याने राज्य परिवहन महामंडळाच्या पुणे विभागाच्या तब्बल ७० एसटी पासिंग विना उभ्या असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे प्रादेशिक आणि बारामती उपप्रादेशिक कार्यालयास त्यामुळे राज्य परिवहन महामंडळाचा करोडो रुपयांचा महसूल बुडाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती त्यानुसार एसटी पासिंग करणेसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१०-०४-२०१८) :** (१) होय.

(२) दि.०१.११.२०१७ पासून परिवहन विभागाच्या ज्या प्रादेशिक कार्यालयांमध्ये २५० मीटर लांबीचा ब्रेक टेस्ट ट्रॅक उपलब्ध नाही, अशा प्रादेशिक परिवहन कार्यालयाअंतर्गत येणाऱ्या वाहनांची योग्यता प्रमाणपत्र नुतनीकरण चाचणी घेता येणार नाही, असे आदेश मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दि.१४.०९.२०१७ रोजी दिले. पुणे व बारामती येथे २५० मीटर लांबीचा ब्रेक टेस्ट ट्रॅक उपलब्ध नाही. त्यामुळे महामंडळाच्या पुणे विभागातील ७० वाहनांचे पासींग उशीरा झाल्याने माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वाहन कमतरतेमुळे २.६२ लाख कि.मी. रद्द होऊन महामंडळास रु.८३.५५ लाख इतक्या उत्पन्नापासून वंचित रहावे लागले आहे.

(३) व (४) मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाच्या अनुषंगाने पुणे व बारामती येथे २५० मीटर लांबीचा ब्रेक टेस्ट ट्रॅक उपलब्ध नसल्याने, राज्य परिवहन महामंडळाच्या पुणे विभागाची वाहने पिंपरी-चिंचवड (मोशी) व सोलापूर आरटीओ येथून पासींग करुन घेण्यात आली आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### उल्हासनगर (जि.ठाणे) येथील भागीदारांनी भूखंड खरेदी करताना केलेला गैरव्यवहार

**(२८) १०६८४४ (०१-०४-२०१८). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) येथील मोती दुसेजा यांनी २०१४ मध्ये दुजेसा व अन्य भागीदारांनी एकत्रितपणे १५ हजार चौ.फुटांच्या प्लॉट क्र.६२० शीट नं.७६ हा भूखंड खरेदी करताना बनावट सनद बनवून खरेदी केल्याचे माहे जानेवारी, २०१८ वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुण्याच्या सी.आय.डी. विभागाने सनदांवरील सह्या बनावट असल्याचे सांगितल्याने दोषींवर गुन्हे दाखल करण्याबाबत जिल्हाधिकारी ठाणे यांनी संबंधीताना आदेश दिल्याचे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती खोट्या सह्या करून सदन बनविणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणत्या कलमान्वये गुन्हे दाखल केले आहेत व त्यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे.

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२६-०४-२०१८) :** (१), (२), (३) व (४) प्लॉट क्र.६२०, शीट क्र.७६ ह्या भूखंडासंदर्भात प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने, चौकशीअंती जिल्हाधिकारी, ठाणे यांनी दि.२६/१०/२०१७ च्या पत्रान्वये संबधितांविरुद्ध गुन्हे दाखल करण्याचे निदेश उपविभागीय अधिकारी, उल्हासनगर यांना दिले होते. त्यानुसार उपविभागीय अधिकारी, उल्हासनगर यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन दि. १०/११/२०१७ रोजी मध्यवर्ती पोलीस ठाणे, उल्हासनगर येथे भादंवि कलम ४२०, ४६७, ४६८, ४७१, १२० (ब) सह भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम १३ (१) (क) (ड) प्रमाणे गुन्हा रजि. नं.३१५/२०१७ नोंदविण्यात आला आहे. गुन्ह्याचा तपास आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर यांचेकडून सुरु आहे. दोन कर्मचा-यांविरुद्ध विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## चिखली (जि.बुलढाणा) एसटी महामंडळाच्या बसस्थानकांची झालेली दुरावस्था

**(२९) १०७६५४ (०१-०४-२०१८). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिखली (जि.बुलढाणा) एस.टी. महामंडळाच्या बसस्थानकामध्ये स्वच्छतेचा अभाव, शौचालयाची दुरावस्था, रस्त्यांची दुर्दशा झाली असून मोठेमोठे खडडे पडले असून प्रवाशांना त्रास होत असल्याचे तसेच चिखली बसस्थानकांच्या परिसरात बि.ओ.टी. तत्वावर व्यावसायिक गाळे बांधण्यासाठी व बस स्थानकाच्या संपूर्ण परिसरातील रस्ते डांबरीकरण करण्याबाबत मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी वारंवार मागणी करण्यात येवूनही अदयापी कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याचे माहे डिसेंबर, २०१७ व जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील बसस्थानकांमध्ये प्रवाशांच्या सोयी सुविधा पुरविण्याकडे अधिकारी दुर्लक्ष करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती शासनाने दखल घेऊन चिखली एसटी महामंडळाच्या बसस्थानकांची झालेली दुरवस्था दूर करण्यासाठी प्रवाशांना आवश्यक सोयी सुविधा देण्याबाबत,चिखली बसस्थानकाच्या परिसरात व्यावसायिक गाळे व परिसरात रस्त्यांचे डांबरीकरण करण्याबाबत तसेच या प्रश्नाकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१०-०४-२०१८) :** (१), (२) व (३) बुलढाणा जिल्हयातील चिखली बसस्थानकाची स्वच्छता दि.०१.१२.२०१७ पासून ब्रिक्स इंडिया प्रा.लि. पुणे या संस्थेमार्फत करण्यात येत आहे. तसेच, बसस्थानकावरील शौचालयाची देखभाल अखिल भारतीय मेहतर समाज सेवा मंडळ, भुसावळ यांचेमार्फत करण्यात येत आहे. चिखली बसस्थानकाचे डांबरीकरणाचे काम सन-२००७ साली करण्यात आले असून, परिसरातील रस्त्यांची स्थिती साधारण आहे. बसस्थानकावरील खड्डे खडी व मुरुम टाकून बुजविण्यात आले आहेत.

चिखली येथील बसस्थानकाची इमारत सुस्थितीत असून, प्रवाशांना बसण्यासाठी सिमेंटचे बेंच, हिरकणी कक्ष, पोलीस चौकी, पिण्याचे पाणी, विद्युत व्यवस्था इ. सुविधांबरोबच पुस्तकालय, मोबाईल शॉपी, उपहारगृहे (२), सायबर कॅफे, रसवंती गृह, दुरध्वनी कक्ष, फळ दुकान, जनरल प्रोव्हिजन, ब्युटी पार्लर, केश कर्तनालय, चिक्की स्टॉल इ. वाणिज्य आस्थापना कार्यरत आहेत. सद्यस्थितीत बसस्थानकामध्ये बी.ओ.टी. तत्वावर व्यावसायिक गाळे बांधणे महामंडळाच्या विचाराधीन नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नेवासा (जि. अहमदनगर) बस स्थानकांत अवैध धंदे व गुन्हेगारीमुळे प्रवाशांमध्ये निर्माण झालेली असुरक्षितता**

**(३०) १०७८९५ (०१-०४-२०१८). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेवासा (जि.अहमदनगर) बस स्थानकांत अवैध धंदे चालू असून अवैध धंदे व वाढत्या गुन्हेगारीमुळे प्रवाशांमध्ये असुरक्षितता निर्माण झाल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती बस स्थानकांतील अवैध धंद्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१०-०४-२०१८) :** (१) नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोनई (ता.नेवासा, जि.अहमदनगर) येथे बेकायदा प्रवासी वाहतूक सुरु असल्याबाबत**

**(३१) १०७९०६ (०१-०४-२०१८). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोनई (ता.नेवासा, जि.अहमदनगर) येथे पोलीस ठाण्याशेजारच्या रस्त्याने दररोज २०० हून अधिक जीपगाडया बेकायदा प्रवासी वाहतूक करीत असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या बेकायदा प्रवासी वाहतूकीकडे सोनाई पोलीस तसेच आरटीओकडून कोणतीच कारवाई करण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती बेकायदा प्रवासी वाहतूक करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१२-०४-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) बेकायदा प्रवासी वाहतुकीवर पोलीस विभाग व परिवहन विभाग यांचेकडून स्वतंत्रपणे कारवाई केली जाते. उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, श्रीरामपूर यांच्या अधिनस्त अंमलबजावणी पथकांमार्फत संपूर्ण श्रीरामपूर तालुक्यामध्ये अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांवर नियमितपणे कारवाई करण्यात येते.

श्रीरामपूर तालुक्यात अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्या बस व जीपसदृश्य वाहनांविरुध्द एप्रिल, २०१६ ते जानेवारी, २०१८ या कालावधीत ४०४३ वाहने तपासण्यात आली असता २०९२ वाहने दोषी आढळून आली आहेत. ११७ वाहने अटकावून ठेवण्यात आली आहेत. तडजोड शुल्क व कर वसूलीपोटी एकूण रू.२४.७५ लाख वसूल करण्यात आले आहे. तसेच ६६ वाहनांचे परवाने व २८८ वाहनांची नोंदणी निलंबित करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### पुणे प्रादेशिक परिवहन कार्यालयात दलालांमार्फत नागरिकांच्या होणाऱ्या लुटमारीबाबत

**(३२) १०७९३८ (०४-०४-२०१८). प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रादेशिक परिवहन कार्यालय दलाल मुक्त करण्यासाठी परिवहन कार्यालयाकडून प्रयत्न झाले मात्र त्यानंतरही परिवहन अधिकाऱ्यांच्या केबिन खालीच दलालांचा वावर वाढवू लागल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आर टी ओ कार्यालयाने तब्बल १६ सेवा ऑनलाईन केला आहेत, मात्र याबाबत नागरिकांना मार्गदर्शन करण्यासाठी हेल्प डेस्क कार्यालयात उपलब्ध नाही परिणामी नागरिकांना ऑनलाईन पद्धतीमध्ये येणाऱ्या तांत्रिक अडचणींमुळे दलालांची मदत घ्यावी लागते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, त्यानुसार प्रादेशिक परिवहन कार्यालय दलाल मुक्त करण्यासाठी कोणती कार्यवाही केली तसेच संबंधित दोषीवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२५-०४-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे येथे नागरिकांना उपलब्ध करून द्यावयाच्या सेवा मध्यस्थांशिवाय पूर्ण होण्याकरिता खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आलेली आहे.

(१) प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे येथे अनुज्ञप्ती विषयक कामकाजासाठी 'सारथी ४.०' व वाहन विषयक कामकाजासाठी 'वाहन ४.०' ही ऑनलाईन प्रणाली सुरु करण्यात आली आहे.

सदर प्रणालीद्वारे अर्जदार स्वत: त्यांच्या सोयीनुसार ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर तसेच ऑनलाईन शुल्क भरणा करु शकतात. अर्जदाराकडे इंटरनेट सुविधा उपलब्ध नसल्यास सदर प्रक्रिया 'नागरी सुविधा केंद्रामार्फत' पुर्ण करु शकतात. अनुज्ञप्ती अथवा वाहनांच्या कामकाजासाठी अर्जदारांना कार्यालयात येण्याची अथवा मध्यस्थांची मदत घेण्याची आवश्यकता राहिली नाही, तसेच ऑनलाईन अर्ज व शुल्क भरल्यानंतर त्यांचे अर्ज कार्यालयात जमा केले जातात.

(२) कार्यालयात अर्ज सादर केल्यानंतर त्यांचे काम कोणत्या टप्प्यावर आहे. याबाबतची माहिती प्रणालीद्वारे त्यांच्या नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर लघुसंदेश (एसएमएस) पाठविण्यात येतो. तयार झालेले नोंदणी प्रमाणपत्र/लायसन्स पोस्टामार्फत अर्जदाराच्या नोंदणीकृत पत्त्यावर पाठविण्यात येते.

(३) याशिवाय ऑटोरिक्षा परवान्याचे अर्ज, इरादापत्र देणे, योग्यता प्रमाणपत्र शुल्क भरणे व अपॉइंटमेंट घेणे, वाहनांचा कर भरणे यासेवा देखील ऑनलाईन उपलब्ध असल्यामुळे त्यासाठी कार्यालयात न येता ऑनलाईन सेवेचा नागरिक लाभ घेत आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### अमरावती ते नागपूर या मार्गावर परिवहन विभागाच्या साध्या बसेस सोडण्याबाबत

**(३३) १०९०५७ (०१-०४-२०१८). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावतीवरुन नागपूर येथे रात्री ८ ते १२ च्या दरम्यान जाणाऱ्या परिवहन विभागाच्या साध्या बसेसच्या ऐवजी शिवशाहीच्या लक्झरी बसेस सोडण्यात येत असल्याने स्थानिकांना आर्थिक भुर्दंड सोसावा लागत असुन विद्यार्थी व जेष्ठ नागरिकांचे सवलतीचे पासेस व तिकीट बस मिळत नसल्याने विद्यार्थी व जेष्ठ नागरिकांनाही या बसेस त्रासदायक असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना मोझरी, तिवसा, तळेगांव येथे थांबा नसणे किंवा थांबा असल्यास बसेस थांबत नसल्याचे नागरिक व विद्यार्थ्यांसाठी त्रासदायक होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत स्थानिक प्रवाशांनी वारवांर स्थानिक परिवहन विभागाकडे तक्रारी करुनही याबाबत कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास,चौकशीअंती अमरावतीवरुन नागपूर येथे परिवहन विभागाच्या साध्या बसेस सोडण्याबाबत तसेच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना मोझरी, तिवसा, तळेगांव येथे बस थांबा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१०-०४-२०१८) :** (१) नाही.

नागपूर येथे जाणाऱ्या रात्री ८ ते १२ वा. च्या दरम्यान परतवाडा-वर्धा १९.४५ वा., अमरावती-आर्वी २०.०० वा., शेगांव-नागपूर २०.०० वा., मोझरी-शिरगांव २०.०० वा., अकोला-नागपूर २०.४५, २१.१५, २२.१५ व तेल्हारा-नागपूर १२.०० वा. अशा साध्या बसेस उपलब्ध आहेत. राज्य परिवहन महामंडळाच्या शिवशाही  बसेसमध्ये सद्या विद्यार्थी व ज्येष्ठ नागरिकांना सवलत देण्यात येत नाही.
(२), (३) व (४) अमरावती ते नागपूर या मार्गावर धावणाऱ्या महामंडळाच्या सर्व बसेसंना मोझरी, तिवसा, तळेगांव येथे अद्यावत बसस्थानक असून तेथे बसथांबा देण्यात आलेला आहे. सदर बसथांब्यांवर सकाळी ०६.०० ते रात्री १०.०० वा. पर्यंत वाहतूक नियंत्रकाची नियुक्ती करण्यात आलेली असून, या ठिकाणी बसेस थांबविण्याबाबत सर्व आगारांना सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच, महामंडळाद्वारे अमरावती-तिवसा करीता रात्री ०८.४५ वा. ची ग्रामीण साधी बस फेरी सुरु करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कल्याण बस डेपोतील सुविधांकडे व स्वच्छतेकडे दुर्लक्ष होत असल्याबाबत**

**(३४) १०९०६४ (०१-०४-२०१८). श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण बस डेपोची इमारत १९७२ मध्ये उभारण्यात आली या इमारतीचे स्ट्रक्चर ऑडीट करणे आवश्यक आहे, परिवहन विभागाच्या दुर्लक्षिततेमुळे अनेक ठिकाणी छतांचे प्लास्टर पडले आहे, डेपोतील चालक वाहकांची संख्या १५० इतकी असून डेपोतील बसगाड्यांची संख्या ७० आहे, डेपोतील व डेपोच्या बाहेरून येणाऱ्या बस गाड्यांची संख्या २७० इतकी आहे, कल्याण हे रेल्वे व रस्ते वाहतुकीचे जंक्शन असून तेथील एस.टी डेपोतील सुविधांकडे व स्वच्छतेकडे दुर्लक्ष होत आहे  असे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कल्याण डोंबिवली परिवहन सेवेला दिलेल्या बस थांब्यांजवळ कचरा जाळला जातो व त्या धुराचा त्रास प्रवाशांना सहन करावा लागतो, बस बाहेर पडतात तेथे महिलांकरिता असलेले शौचालय गैरसोयीचे आहे त्यामुळे त्यांची कुचंबना होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, डेपो स्वच्छतेचे काम खाजगी कामगारांकडून करून घेतले जाते, डेपोला दर दिवसाला ४ ते ५ लाखांचे उत्पन्न असतानाही प्रवशांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यावर शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१०-०४-२०१८) :** (१) नाही.

(२) कल्याण बसस्थानकातील कचराकुंडी महानगरपालिकेने उचलून नेली आहे. त्यामुळे सदर ठिकाणी उघडयावर टाकण्यात आलेला कचरा वाऱ्याने उडून जात असल्यामुळे तो जाळण्यात येत होता. सद्यस्थितीत महानगरपालिकेस महामंडळाच्या दि.१७.११.२०१७ च्या पत्रान्वये कचराकुंडी पुन्हा ठेवण्याबाबत विनंती करण्यात आली असून, कचरा न जाळण्याबाबत संबंधितांना सूचना देण्यात आलेल्या आहेत. सदर बसथांब्यावरील महिला प्रवाशांसाठी पुरविण्यात आलेले प्रसाधनगृह गैरसोयीचे नाही.

(३) कल्याण आगारातील बसस्थानकाची साफसफाई ही निर्मल भारत सेवा भावी संस्थेकडून मोफत करण्यात येत आहे. तसेच, आगार कार्यशाळा, कार्यालय, आगार कार्यशाळेतील प्रसाधनगृह, बसेस इ. ची मे. ब्रिस्क इंडिया लि. या खाजगी संस्थेकडून साफसफाई करुन घेण्यात येत आहे. तसेच, बसस्थानकात प्रवाशांच्या सोयीसाठी आसनव्यवस्था, प्रतिक्षालय, वाहतूक नियंत्रण कक्ष, संगणकीय आरक्षण व्यवस्था, विद्युत व्यवस्था, उपहारगृह, पुस्तकालय, फळदुकान, रसवंतीगृह, पार्सल कार्यालय, पोलिस बुथ, पिण्याच्या पाण्याची सोय इ. सोयी आहेत. त्यामुळे प्रवाशांची गैरसोय होत नाही.

(४) कल्याण आगारातील बसस्थानकाच्या इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडीट मे, २०१६ मध्ये करुन घेण्यात आले, त्यामध्ये इमारतीचे अत्यावश्यक दुरुस्तीचे काम करणे सुचविण्यात आले होते. सदर इमारत फार जुनी असल्याने, त्याचे प्लॅस्टर काही ठिकाणी गळून पडत असल्याचे लक्षात आल्याने ते काढून घेण्यात आलेले आहे. सदर बसस्थानकाची पुनर्बांधणी करुन त्याठिकाणी अद्यावत बसपोर्टची आखणी करणेसाठी तज्ञ प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार संस्थेची नेमणूक करण्यासाठी जाहीर निविदा मागविण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्य कृषी मूल्य आयोगाचे कार्यालय व त्याची व्यवस्थेबाबत**

**(३५) १०९५४६ (०१-०४-२०१८). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य सरकारने दिनांक १ जुलै, २०१७ रोजी वा त्यासुमारास राज्यात पहिल्यांदाच राज्य कृषी मूल्य आयोगाची निर्मिती केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनामार्फत शेतमालाच्या भावाबाबत केंद्र सरकारला शिफारस करणे हे राज्य कृषी मूल्य आयोगाचे महत्वाचे काम आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य कृषी मूल्य आयोगाचे कार्यालय राज्यात अद्याप कोठेही सुरु झाले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर आयोगाचे कार्यालय व त्याची व्यवस्था याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (२७-०४-२०१८) :** (१) कृषी विभागातील शेतमाल भाव समितीचे रुपांतर राज्य कृषि मूल्य आयोगात दि. २३ एप्रिल, २०१५ च्या शासन निर्णयान्वये करण्यात आलेले आहे, हे खरे आहे.
(२) होय.
(३) हे खरे नाही, राज्य कृषी मूल्य आयोगाचे कार्यालय हे सर. एच. सी. दिनशॉ बिल्डिंग, २ रा माळा, हार्निमन सर्कल जवळ, फोर्ट, मुंबई-२३. येथे सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पंढरपूर (जि.सोलापूर) येथील बस स्थानक परिसरातील खड्डे बुजवुन इतर सोई सुवधा देण्याबाबत**

**(३६) १०९७३७ (०१-०४-२०१८). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पंढरपूर, (जि.सोलापूर) येथील महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या बस स्थानक परिसरात जागो-जागी खड्डे असल्यामुळे, धुळीमुळे नागरिकांचे आरोग्य व अपघात होण्याची शक्यता निर्माण झाल्याचे दिनांक ०६ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाराष्ट्र परिवहन विभाग यांनी पंढरपूर बस स्थानकातील खड्डयांबाबत व इतरही असुविधांबाबत प्रवाशांनी व स्थानिक नागरिकांनी संबंधीत परिवहन विभागातील प्रशासनाकडे वेळोवेळी विनंती, आंदोलने केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीअंती महाराष्ट्र परिवहन विभाग यांनी पंढरपूर येथील बस स्थानक परिसरातील खड्डे बुजविण्याबाबत व परिसरातील इतर सोई-सुविधा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१०-०४-२०१८) :** (१) होय.
(२) नाही.
(३) व (४) सदर ठिकाणी वाहनतळाचे शासन निधीतून कॉंक्रीटीकरण करणेसाठी रु.३,५५,४६,३२७/- एवढया रकमेचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, सोलापूर यांचेमार्फत विभागीय आयुक्त पुणे यांचेकडे दि.०५.०२.२०१८ रोजी सादर करण्यात आला आहे.

सद्यस्थितीत बसस्थानकातील खड्डे मुरुम, खडी व ग्रीटने भरुन घेण्यात आले आहेत. तसेच, बसस्थानकावर लाईट, पंखे, पाण्याची व्यवस्था, प्रसाधनगृह, हिरकणी कक्ष, आसनव्यवस्था, प्रतिक्षालय, आरक्षण व्यवस्था इ. सोयी उपलब्ध आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मंचर (जि.पुणे) येथील एस.टी.बस स्थानकामधून सोडण्यात येणाऱ्या बससेवा गाडयांच्या अनियमिततेबाबत**

**(३७) १०९७८५ (०१-०४-२०१८). श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मंचर (जि.पुणे) येथील एस.टी. बस स्थानकामधून आजूबाजूच्या ४० गावांमध्ये विद्यार्थी, व्यापारी वर्ग, सर्वसामान्य जनतेच्या सोयीसाठी बससेवा सुरु करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रत्यक्षात मात्र एस.टी. बसेस विहित वेळापत्रकानुसार सोडण्यात न येणे, विद्यार्थ्यांच्या महाविद्यालयाच्या सकाळी वेळेनुसार सुटत नसल्याने पासधारक विद्यार्थी विशेषत: विद्यार्थींना त्याचा त्रास सहन करावा लागतो, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, एस.टी.बसेस विहित केलेल्या वेळापत्रकानुसार सोडण्यात काय अडचणी आहेत,
(४) असल्यास, एस.टी.बसेस वेळच्यावेळी सोडण्याच्या दृष्टीने विद्यार्थींनी दिनांक ३ जानेवारी २०१८ रोजी वा त्या सुमारास मंचर वाहतूक नियंत्रकास घेरावा घातला होता, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(६) असल्यास, चौकशीअंती एस.टी.बस वेळापत्रकानुसार वेळच्यावेळी सोडण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१०-०४-२०१८) :** (१) होय.
(२), (३) व (४) सदर कालावधीत मोठ्या प्रमाणात प्रासंगिक करार, वाहतूक कोंडी व चालक/वाहक यांची गैरहजेरी यामुळे बसेसची नियमितता विस्कळीत झाली होती. त्यामुळे दि.०८.०१.२०१८ रोजी प्रवासी व विद्यार्थ्यांनी मंचर येथे आंदोलन केले होते.
(५) व (६) मंचर बसस्थानकावरुन चालविण्यात येणाऱ्या ग्रामीण भागातील सर्व फेऱ्या नियमित व नियोजित वेळेवर सोडण्याचे लेखी आदेश आगार व्यवस्थापक, नारायणगांव व राजगुरुनगर यांना विभागीय कार्यालयाकडून देण्यात आलेले आहेत.
(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बनावट कागदपत्रे देऊन मिळविलेले रिक्षा टॅक्सी परवाने रद्द करणेबाबत**

**(३८) ११०३४५ (०१-०४-२०१८). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील रिक्षा व टॅक्सीसाठी व्यावसायिक परवाने पाच वर्षासाठी त्यांना व्यवसाय करण्यासाठी दिला जातो, तो परवाना दुसऱ्याला भाड्याने देता येत नाही, असा राज्य परिवहनचा नियम आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य परिवहन कार्यालयात खोटी व अपूर्ण कागदपत्रे देवून ज्यांनी टॅक्सी व रिक्षाचे परवाने काढले आहेत व ज्यांनी रिक्षा टॅक्सीच्या नोंदी केल्या आहेत, त्या रिक्षा टॅक्सी नोंदी कमी कराव्यात असे वेस्टर्न झोनचे अधिकारी यांनी आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती उक्त रिक्षा व टॅक्सींचे परवाने रद्द करण्याबाबत तसेच राज्य परिवहन कार्यालयात खोटी व अपूर्ण कागदपत्रे देवून ज्यांनी टॅक्सी व रिक्षाचे परवाने काढले आहेत अशा संबंधित दोषींवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१६-०४-२०१८) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) व (४) मोटार वाहन अधिनियम, १९८८ व त्याखालील नियमांमध्ये परवाना करारनाम्यावर देण्याची कोणतीही तरतूद नाही. खोटी व अपूर्ण कागदपत्रे सादर करुन ज्यांनी ऑटोरिक्षाचे परवाने व इरादापत्र प्राप्त केले आहेत अशा प्रकरणांची फेरतपासणी करण्यात येवून अर्जदाराची अनुज्ञप्ती, वाहनाची नोंदणी, परवाना इ. प्रमाणपत्रे बनावट कागदपत्रांच्या आधारे प्राप्त केल्याचे आढळुन आल्यास सदर परवाने रद्द करण्याची कारवाई करण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शिरोळ (जि.कोल्हापूर) तालुक्यात परतीच्या पावसामुळे**
**शेती व फळपिकांचे नुकसान झाल्याबाबत**

**(३९) ११०४५२ (०१-०४-२०१८). श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरोळ (जि.कोल्हापूर) तालुक्यात माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान परतीच्या पावसामुळे ऊस लागवडीची वाढ खुंटली असून द्राक्षबागा उदध्वस्त झाल्या, भूईमूग व सोयाबीनसह रोपवाटिकांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यात किती शेतकऱ्यांचे नुकसान झाले व त्याची पाहणी शासनाने केली आहे काय,

(३) असल्यास, या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२६-०४-२०१८) :** (१) व (२) कोल्हापूरसह शिरोळ तालुक्यात माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये झालेल्या परतीच्या पावसामुळे ऊस, द्राक्ष, सोयाबीन व इतर पिकांचे मिळून ९९.५९ हेक्टर क्षेत्राचे २८५ शेतकऱ्यांचे नुकसान झाले असल्याचे निदर्शनास आले आहे.
(३) दिनांक २७ ऑक्टोबर, २०१७ रोजीच्या शासन पत्रान्वये ऑक्टोबर, २०१७ मध्ये परतीच्या पावसामुळे झालेल्या शेती व फळपिकांच्या नुकसानीचे पंचनामे करुन, पिकांच्या नुकसानीबाबतचा अहवाल शासनास सादर करण्याबाबतच्या सूचना क्षेत्रिय अधिकाऱ्यांना देण्यात आल्या होत्या.

सदर माहिती संकलित करण्याचे काम प्रगतीपथावर असून या संदर्भात प्राप्त होणाऱ्या माहितीच्या अनुषंगाने नुकसानग्रस्तांना आर्थिक मदत देण्याबाबतचा निर्णय घेण्याची बाब प्रस्तावित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वर्धा जिल्ह्यात एसटी आगारांत सुस्थितीत नसलेल्या बसेस ग्रामीण भागात सोडल्याबाबत**

**(४०) ११०८२३ (०१-०४-२०१८). श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वर्धा जिल्ह्यात सर्व एसटी आगारात सुस्थितीत नसलेल्या बसेस कार्यरत असून या बसेस ग्रामीण भागात जादा संख्येने सोडल्या जात असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या सुस्थितीत नसलेल्या गाड्यामुळे प्रवाशांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असून बस नादुरुस्ती झाल्यास पायपीट करावी लागते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ग्रामीण भागात सुस्थितीतील बसेस सोडण्याची मागणी नागरिकांनी वारंवार केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त मागणीनुसार चांगल्या स्थितीतील बसेस ग्रामीण भागात सोडण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१०-०४-२०१८) :** (१) व (२) नाही.
(३) मा.विधानसभा सदस्य (हिंगणघाट) यांनी नवीन बसेस उपलब्ध करुन देण्याची विनंती दि.१८.१२.२०१७ रोजीच्या पत्रान्वये केलेली आहे.
(४) सद्यस्थितीत वर्धा विभागाकडे २९९ बसेस उपलब्ध आहेत. सदर बसेसची देखभाल/दुरुस्ती राज्य परिवहन महामंडळाच्या नियतकालीक देखभाल कार्यक्रमांतर्गत केली जाते.

तसेच, महामंडळाची वाहने सुस्थितीत ठेवण्याकरीता सदर वाहनांचे दरवर्षी आरटीओ पासींग करुन घेण्यात येते. त्याचप्रमाणे पुन:स्थितीकरण करण्यात येते, त्यामध्ये दैनिक, दशदिनी, त्रैमासिक देखभालीचा समावेश आहे. आगारातील वाहनांचा ताफा अधिक सक्षम राहण्यासाठी नवीन वाहनांचा पुरवठा वाहन उपलब्धतेनुसार करण्यात येतो व मुदतबाह्य झालेली वाहने मोडित काढण्यात येतात.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**परिवहन विभाग बुलढाणा अंतर्गत विकास कामे प्रलंबित असल्याबाबत**

**(४१) ११०९४१ (०४-०४-२०१८). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा येथील परिवहन विभागाच्या हलगर्जीपणामुळे कार्यरंभ आदेश झालेल्या चार कोटी रूपयांची विविध विकास कामे प्रलंबित असल्याची बाब दिनांक १५ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त बाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती कार्यरंभ आदेश झालेल्या चार कोटी रूपयाच्या विविध विकास कामे सुरू करण्यात हलगर्जीपणा करणाऱ्या संबंधीतांवर कारवाई करण्याबाबत तसेच विविध विकास कामे सुरू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१०-०४-२०१८) :** (१) नाही.
(२) व (३) बुलढाणा विभागाअंतर्गत शासन निधीतून सिंदखेडराजा, देऊळगांवराजा व नांदुरा बसस्थानकांचे आवारास कुंपणभिंत बांधकाम करण्याचे कार्यारंभ आदेश देण्यात आलेले असून, ही कामे प्रगतीपथावर आहेत.
लोणार, सिंदखेडराजा, खामगांव व अमडापूर बसस्थानकाचे आधुनिकीकरण/दर्जावाढ/ पुनर्बांधणी करण्याच्या कामाचे कार्यारंभ आदेश देण्यात आलेले असून, सिंदखेडराजा, अमडापूर व लोणार या बसस्थानकाच्या कामासाठी मे.आर्क असोशिएट्स, औरंगाबाद या वास्तुविशारदाची नियुक्ती केली आहे.
बांधकाम परवानगीसाठी संबंधित नगरपालिका/ ग्रामपंचायत यांचेकडे रितसर अर्ज करण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लांजा (जि.रत्नागिरी) तालुक्यात वादळीवाऱ्यासह पडलेल्या मुसळधार पावसामुळे घरांचे झालेले नुकसान**

**(४२) १११३६० (०१-०४-२०१८). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लांजा (जि.रत्नागिरी) तालुक्यात माहे जुलै, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान वादळीवाऱ्यासह पडलेल्या मुसळधार पावसामुळे गवाणे गावातील १३ अंशतः घरांचे सुमारे ३१ लाख ६७ हजार रुपयांचे नुकसान झाले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त गवाणे गावातील घरांच्या झालेल्या नुकसानीचा तलाठयांनी पंचनामा करुन नमुद करण्यात येऊनही अदयाप शासनाकडून नुकसान भरपाई मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीअंती नुकसानग्रस्तांना तात्काळ नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१२-०४-२०१८) :** (१), (२), (३) व (४) रत्नागिरी जिल्हयातील लांजा तालुक्यातील मौजे गवाणे येथे माहे जुलै, २०१७ मध्ये अतिवृष्टी व वादळामुळे १३ घरांचे व एका समाज मंदिराचे अंशत: असे एकूण रु.२,९१,४५०/- एवढे नुकसान झाल्याचे निदर्शनास आले. सदर १३ घरांचे व एका समाज मंदिराचे तलाठी, गवाणे यांच्यामार्फत पंचनामे करण्यात आले असून शासन निर्णय दिनांक १३.०५.२०१५ अन्वये अंशत: नुकसान झालेल्या १२ घरांच्या संबंधित आपदग्रस्तांना एकूण रुपये ३९,९००/- एवढया मदतीचे वाटप करण्यात आले आहे.

उर्वरित एका घराचे आवश्यक कागदपत्र संबंधितांनी शासनजमा केले नसल्याने त्यांना मदत देण्यात आली नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अकोला (जि.अकोला) येथे नवीन बसेस तातडीने देण्याबाबत**

**(४३) ११२२२३ (०१-०४-२०१८). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला (जि.अकोला) येथे नादुरुस्त झालेल्या परिवहन महामंडळाच्या बसेस रस्त्यावर धावत असल्यामुळे प्रवाशांना धोका निर्माण झाला असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नवीन बसेसचा पुरवठा करण्यासंदर्भात अकोला येथील परिवहन महामंडळाच्या विभागाने शासनाकडे पाठपुरावा करुन देखील नवीन बसेस न देण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, अकोला येथे नवीन बसेस तातडीने देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१०-०४-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) राज्य परिवहन महामंडळाद्वारे अकोला विभागास सन २०१५ ते जानेवारी, २०१८ या कालावधीत एकूण ९१ नवीन बसेस देण्यात आल्या असून, त्यामध्ये १५ शिवशाही बसेसचा समावेश आहे. तसेच, सदर कालावधीत अकोला विभागातील एकूण ४९ जुन्या बसेस मोडित काढण्यात आलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक जिल्हयात ओखी वादळ, बोंडअळी ने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई न मिळाल्याबाबत**

**(४४) ११३६७१ (०१-०४-२०१८). श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्हयात ओखी वादळ, बोंडअळी ने नुकसान झालेल्या १४२ गावांतील शेतकऱ्यांना अद्यापही नुकसान भरपाई देण्यात आली नसल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बोंडअळीने नुकसान झालेल्या क्षेत्रांचे अद्यापही पंचनामे बाकी असल्याने अंतिम नुकसान निश्चिती अद्यापही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरचे पंचनामे करून तातडीने मदत मिळावी याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधी व शेतकऱ्यांनी वारंवार लेखी वा तोंडी निवेदनाद्वारे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२६-०४-२०१८) :** (१), (२), (३) व (४) नाशिक जिल्हयात ओखी वादळ व बोंडअळीमुळे नुकसान झालेल्या क्षेत्राचे पंचनामे करुन, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने मदत देण्याबाबतची स्थानिक लोकप्रतिनिधी व शेतकऱ्यांची निवेदने प्राप्त झाली असल्याचे निदर्शनास आले आहे.

त्याअनुषंगाने शासन निर्णय दिनांक २१.०२.२०१८ अन्वये ओखी चक्रिवादळ व त्यामुळे आलेल्या अवेळी पावसामुळे नाशिक विभागातील नुकसान झालेल्या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत म्हणून रु. २,३७,३७,०००/- एवढा निधी वितरीत करण्यात आलेला आहे. तसेच शासन निर्णय दिनांक १७.०३.२०१८ अन्वये, खरीप २०१७ मध्ये बोंडअळीच्या प्रादुर्भावामुळे कापूस पिकांचे झालेल्या नुकसानीपोटी व तुडतुडे किडीच्या प्रादुर्भावामुळे धान पिकांच्या झालेल्या नुकसानीपोटी बाधितांना मदत देण्याबाबतचा धोरणात्मक निर्णय घेण्यात आलेला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मंचर (ता.आंबेगाव,जि.पुणे) येथील एस.टी.बस स्थानकात ड्रेनेज पाईपलाईन फुटल्याने परिसरात दुर्गंधीचा त्रास प्रवाश्यांना होत असल्याबाबत**

**(४५) ११३६९९ (०१-०४-२०१८). श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंचर (ता.आंबेगाव, जि.पुणे) येथील एस.टी.बस स्थानकात गेली ६ महिन्यापासून ड्रेनेज पाईपलाईन फुटल्याने परिसरात मोठया प्रमाणात दुर्गंधीचा त्रास प्रवाश्यांना होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यात बेवारस जनावरे,भटक्या कुत्रांच्या वावरामुळे प्रवाशी यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मंचर बसस्थानकात मोठया प्रमाणात अनधिकृत वाहने पार्क करणे, त्यामुळे एस.टी.बस चालकांना गाडी चालविण्याचा त्रास सहन करावा लागतो, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत स्थानिक प्रवाश्यांनी तसेच जनतेनी आगार प्रमुखांकडे वारंवार तक्रारी करुनसुध्दा कोणतीच कार्यवाही केली जात नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबतची सर्वसाधारण कारणे काय आहे,

(६) असल्यास, मंचर एस.टी.बस स्थानकात गैरसोयी दूर करण्याबाबत तसेच भटक्या जनावरांचा बंदोबस्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१०-०४-२०१८) :** (१) नाही.

राज्य परिवहन महामंडळाच्या मंचर बसस्थानकामधून ग्रामपंचायतीच्या मुख्य ड्रेनेजला जोडणारी पाईपलाईन माहे डिसेंबर, २०१६ मध्ये तुंबलेली (चोकअप) होती. सदरची पाईप राज्य परिवहन महामंडळाद्वारे तात्काळ साफ करुन सांडपाण्याचा मार्ग पुर्ववत करुन घेण्यात आला असल्यामुळे प्रवाशांना अथवा स्थानिकांना त्रास झालेला नाही.

(२) नाही.

(३), (४) व (५) मंचर बसस्थानकाच्या बाहेर मोठया प्रमाणात दुकानांचे अतिक्रमण असल्यामुळे महामंडळाच्या बसचालकांना गाडी वळवताना त्रास होतो.

सदरबाबत प्रवाशांच्या तोंडी तक्रारींवरुन बसस्थानकाच्या बाहेर भिंतीला लागून असलेली अनधिकृत अतिक्रमणे हटविण्याबाबत महामंडळाच्या दि.२८.०२.२०१८ च्या पत्रान्वये मंचर पोलीस स्टेशन यांना कळविले आहे. तसेच, बसस्थानकावरील वाहनतळासाठी निविदा प्रक्रिया सुरु केली आहे.

(६) मंचर बसस्थानकावर प्रवाशांसाठी प्रसाधनगृह, आसन व्यवस्था, उपहारगृह, पाणपोई इ. सोयी-सुविधा देण्यात आल्या आहेत. तसेच अनधिकृत व्यक्तीं/भटक्या जनावरांचा बसस्थानकांवरील प्रवेश बंद होण्यासाठी बसस्थानकाच्या पुर्वेकडील बाजूला कुंपणभिंतीचे काम चालू आहे.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

**मौजे वाघदर्डी (ता.चांदवड, जि.नाशिक) येथील आंदोलनकर्त्या विद्यार्थी व पालकांवर आगार प्रमुखांमार्फत चांदवड पोलिस स्टेशनमध्ये गुन्हे दाखल करण्यात आल्याबाबत**

**(४६) ११४०२७ (०१-०४-२०१८). डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मनमाड (ता.नांदगाव, जि.नाशिक) आगाराची बस मौजे वाघदर्डी (ता.चांदवड) येथे हात दाखवूनही थांबत नसल्याने माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान विद्यार्थी व पालकांनी रास्ता रोको आंदोलन करून बस थांबविण्याची मागणी केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त आंदोलनकर्त्या विद्यार्थी व पालकांवर आगार प्रमुखांमार्फत चांदवड पोलिस स्टेशनमध्ये गुन्हे दाखल करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी आंदोलनकर्त्यांवर गुन्हे दाखल करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, सदरहू गुन्हे मागे घेऊन विद्यार्थी व पालकांच्या मागणीनुसार बस गाड्या थांबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१०-०४-२०१८) :** (१) राज्य परिवहन महामंडळाकडे असे निवेदन प्राप्त झालेले नाही.

(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उपप्रादेशिक परिवहन कार्यालयातून दलालांना हद्दपार करण्याबाबत**

**(४७) ११४१०७ (०१-०४-२०१८). श्री.विजय भांबळे (जिंतूर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उपप्रादेशिक परिवहन कार्यालयातून एजंटाना (दलालांना) हद्दपार करण्यासाठी त्यांचेवर खंडणीसारखे गुन्हे दाखल करण्याचे आदेश परिवहन आयुक्त डॉ.गोडाम यांनी सर्व प्रादेशिक व उपप्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांना दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परभणी (जि.परभणी) येथील उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाचे आवारात शेकडो एजंट आजही सर्वसामान्य नागरिकांची लुट करीत असल्याबाबतची तक्रार नागरिकांमार्फत जिल्हाधिकारी, परभणी यांचेकडे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास,चौकशीअंती उपप्रादेशिक परिवहन कार्यालयातून एजेंटाना (दलालांना) हद्दपार करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१६-०४-२०१८) :** (१), (२) व (३) होय.
(४) राज्यातील सर्व नियंत्रक अधिकाऱ्यांना परिवहन कार्यालयामध्ये अनधिकृत येणाऱ्या व्यक्तिंकडून नागरिकांची फसवणूक झाल्यास दोषीवर गुन्हे दाखल करावेत याबाबत परिवहन आयुक्त कार्यालयाने दि.१५.०७.२०१७ रोजीच्या पत्रान्वये सूचना जारी केल्या आहेत.

परभणी येथील उप प्रादेशिक परिवहन कार्यालय दलाल मुक्त करण्यात यावे, अशा आशयाचे निवेदन दि.०४.०८.२०१७ रोजी जिल्हाधिकारी, परभणी यांना दिले होते. सदर निवेदनाच्या अनुषंगाने शासकिय शुल्काव्यतिरिक्त जादा पैशाची मागणी केल्यास अनधिकृत व्यक्तिंविरुध्द पोलीस विभागाकडे तक्रार करू शकतात, असे दि.२९.०८.२०१७ रोजीच्या पत्रान्वये संबंधितांना कळविले आहे.

तसेच उप प्रादेशिक परिवहन कार्यालयातील परिसरात अनधिकृत व्यावसायिकांना पायबंद घालणेबाबत उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, परभणी यांनी दि.१८.१२.२०१७ व दि.२१.०२.२०१८ रोजी वरिष्ठ पोलिस निरिक्षक, नवा मोंढा पोलीस स्टेशन यांना कळविले आहे.

परिवहन कार्यालयातील कामांकरीता नागरिकांना मध्यस्थाकडे जाण्याची गरज पडू नये या दृष्टीने विविध उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत. ज्यामध्ये मार्गदर्शन कक्ष, एक खिडकी योजना, ऑनलाईन अपॉईंटमेंट, वेबसाईटमध्ये फॉर्म्स व कार्यपध्दतीची माहिती व कार्यालयात लावलेल्या माहिती फलकांचा समावेश करण्यात आलेला आहे.

तसेच परिवहन कार्यालयात कामकाजासाठी 'सारथी ४.०' व वाहन विषयक कामकाजासाठी 'वाहन ४.०' ही ऑनलाईन प्रणाली सुरु करण्यात आली आहे. सदर प्रणालीद्वारे अर्जदार स्वत: त्यांच्या सोयीनुसार ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करू शकतात तसेच ऑनलाईन शुल्क भरणा करु शकतात. अर्जदाराकडे इंटरनेट सुविधा उपलब्ध नसल्यास सदर प्रक्रिया "नागरी सुविधा केंद्रामार्फत" पुर्ण करू शकतात. अनुज्ञप्ती अथवा वाहनांच्या कामकाजासाठी अर्जदारांना कार्यालयात येण्याची अथवा मध्यस्थांची मदत घेण्याची आवश्यकता राहिली नसून एकूण ३४ सेवा ऑनलाईन करण्यात आल्या आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्य परिवहन महामंडळातंर्गत आगार परिसरात व्यापाराकरिता दिव्यांगांना आरक्षण देण्याबाबत

**(४८) ११५३६१ (०४-०४-२०१८). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य परिवहन महामंडळा अंतर्गत आगर परिसरात व्यापाराकरिता दिव्यांगांना ३ टक्के आरक्षण देणे आणि अंध कर्णबधीर दिव्यांगांना रेल्वे प्रवासामध्ये सवलत देण्याबाबत अन्नत्याग आंदोलनादरम्यान विसस अचलपूर यांना दिलेल्या आश्वासनानुसार मा.मुख्यमंत्री महोदय तसेच मंत्री आणि सचिव यांच्या सोबत झालेल्या दिनांक २४ ऑगस्ट, २०१७ रोजीच्या

बैठकीत झालेल्या निर्णयाची अंमलबजावणी न करणाऱ्या अधिकाऱ्यांवरील कारवाई तसेच अन्य मागण्याबाबत अद्यापि कोणतीही कार्यवाही न झाल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मंत्री महोदय यांच्या दालनात अर्थसंकल्पीय अधिवेशना दरम्यान ठिय्या आंदोलन करण्याबाबत लेखी इशारा दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने दिलेल्या आश्वासन आणि कार्यवाहीबाबत तसेच प्रलंबित प्रश्नांच्या अंमलबजावणीबाबत शासकीय यंत्रणांकडून आढावा घेतला आहे काय,

(३) असल्यास, या प्रलंबित प्रश्नांची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१०-०४-२०१८) :** (१) होय.

(२) व (३) राज्य परिवहन महामंडळाच्या वाणिज्य आस्थापना कार्यपध्दतीनुसार एकुण ३८३५ आस्थापना कार्यरत असून, त्यातील २१७ म्हणजेच ५.६ टक्के आस्थापना अपंगांसाठी राखीव ठेवण्यात आलेल्या आहेत. सदरचे आरक्षण अपंग कायदयानुसार ठेवण्यात आलेले आहे.

तसेच, भारतीय रेल्वे परिषद संघ (IRCA) यांचेद्वारे अंध कर्णबधीर दिव्यांगांना रेल्वे प्रवासामध्ये सवल देण्याबाबतची तरतूद अगोदरच करण्यात आलेली असून, सदर बाबींविषयीचे निर्णय घेण्याचे प्राधिकार भारतीय रेल्वे परिषद संघ (IRCA) यांनाच आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### एसटी महामंडळाच्या कर्मचाऱ्यांची खाजगी एजन्सीकडून घेण्यात आलेल्या परिक्षेत झालेला गैरप्रकार

**(४९) ११५९०७ (०१-०४-२०१८). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एसटी महामंडळाच्या कर्मचाऱ्यांची खाजगी एजन्सीकडून अलिकडेच घेण्यात आलेल्या परिक्षेच्या दरम्यान औरंगाबाद जिल्ह्यात सर्व परीक्षार्थींची जन्मतारीख दिनांक १० ऑक्टोबर, १९९० अशी एकच छापली असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यभर उमेदवारांची एकच जन्मतारीख कशी काय असू शकते असा प्रश्न निर्माण झाल्याने एसटी कर्मचाऱ्यांमध्ये प्रचंड असंतोष पसरला असून त्यांनी शासनाकडे तक्रार नोंदवली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात हजारो विद्यार्थी या परीक्षेला बसले असताना परीक्षेचे नियोजन करणाऱ्या खाजगी संस्थेवर शासनाने काय कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२५-०४-२०१८) :** (१) होय.

(२) नाही.

मात्र, राज्य परिवहन महामंडळाकडे अशी तक्रार प्राप्त झालेली आहे.
(३) सदर परिक्षेसाठी राज्य परिवहन महामंडळाद्वारे खाजगी संस्थेची निवड करण्यात आली होती, सदर संस्थेकडून उमेदवारांची वैयक्तीक माहिती भरताना तांत्रिक चुक झाली आहे. ओळखपत्रात दि.१०.१०.१९९० अशी सिस्टीम जनरेट तारीख नमूद असल्याची बाब निदर्शनास आल्यानंतर बाह्य संस्थेस ही त्रुटी दूर करण्याच्या सूचना देण्यात आल्या. मात्र त्याच वेळी परिक्षेची तारीख नजीक असल्याने, तोपर्यन्त सुधारीत हॉल परमिट तयार करणे बाह्य संस्थेला शक्य नव्हते. ही बाब लक्षात घेऊन खातेअंतर्गत उमेदवारांना महामंडळाच्या ओळखपत्राच्या आधारे परिक्षेस बसू दयावे, अशा सूचना बाह्य संस्थेस देण्यात आल्या होत्या. त्यामुळे हॉल परमिटवर दि.१०.१०.१९९० ही जन्म तारीख नमूद करण्यात आली असली तरी, महामंडळाच्या कोणत्याही उमेदवाराला परिक्षेस बसण्यापासून वंचित रहावे लागले नाही. परिक्षा संपल्यानंतर बाह्यसंस्थेने विभागिय कार्यालयाकडून प्रमाणित करुन घेण्यात आलेल्या माहितीच्या आधारे परीक्षा दिलेल्या महामंडळाच्या सर्व कर्मचाऱ्यांचा डाटाबेस अद्यावत करुन घेतला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### बुलढाणा आगार व विभागातील एस.टी बसेसना नवीन टायर उपलब्ध करण्याबाबत

**(५०) ११५९६४ (०१-०४-२०१८). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा आगारातील २७ तर बुलढाणा विभागातील ७० एस. टी. बसेस टायर अभावी उभ्या असल्याची बाब दिनांक १७ फेब्रुवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बुलढाणा आगारातील ८९ पैकी २७ बसेस उभ्या असल्याने प्रवासी वाहतूक व्यवस्थेवर त्याचा परिणाम झाला आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, प्रस्तुत प्रकरणी दोषी अधिका-यांविरूध्द कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१०-०४-२०१८) :** (१) होय.

सदर कालावधीत राज्य परिवहन महामंडळाच्या बुलढाणा आगारात २६ बसेस व बुलढाणा विभागातील सरासरी ५१ बसेस नवीन टायर उपलब्ध नसल्यामुळे व टायर देखभालीकरीता मार्गबंद होत्या.
(२) नाही.

सदर कालावधीत बुलढाणा आगाराद्वारे प्रवासी वाहतूक सुरळीत सुरु होती. कारण महामंडळाच्या प्रत्येक आगार व विभागांमध्ये बसगाडयांची देखभाल, टायरची दुरुस्ती या कामांसाठीच्या कालावधीत नियतांपेक्षा जास्त बसेस उपलब्ध असतात, त्यामुळे प्रवासी वाहतूकीवर त्याचा परिणाम होत नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

**मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर**
**मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.**